# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- ०८** **// महासभा बैठकीचे कार्यवृत्त //** **दि.२१/०२/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. २१/०२/२०१९ गुरुवार रोजी दुपारी ०४.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर | कापसे मयुर चंद्रकांत | आहुजा मनोज नारायणदास |
| जोहरे प्रिया मधुकर | कापसे प्रतिभा चंद्रकांत | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| नेरकर सरिता अनंत | देशमुख प्रतिभा गजानन | सोनार रंजना विजय |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील विजय पुडलिक | खडके विश्वनाथ सुरेश |
| खान रुकसानाबी गबलु | सोनवणे सुरेश माणिक | भंगाळे विष्णु रामदास |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | बारी शोभा दिनकर | तायडे ज्योती शरद |
| बाविस्कर किशोर रमेश | शेख हसीनाबी शरीफ | लढढा नितीन बालमुकुंद |
| सपकाळे रंजना भरत | पाटील कुलभुषण विरभान | बरडे नितीन मनोहर |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| सोनवणे भारती कैलास | पाटील उषा संतोष | नाईक प्रशांत सुरेश |
| चौधरी चेतना किशोर | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे मुकुंदा भागवत | राणे गायत्री इंद्रजित | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| काळे अमित पांडुरंग | तायडे सुरेखा नितीन | देशमुख सुन्नाबी राजु |
| चौधरी मंगला संजय | चव्हाण ज्योती बाळासाहेब | शेख सैईदा युसुफ |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | मराठे जितेंद्र भगवान | **स्विकृत सदस्य** |
| सोनवणे धिरज मुरलीधर | सोनवणे सुरेखा सुदाम | सोनवणे कैलास नारायण |
| काळे दिपमाला मनोज | ढेकळे सदाशिव गणपत | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| पाटील सचिन भिमराव | पाटील राजेंद्र झिपरु | मराठे राजेंद्र नारायण |
| भोईटे लताबाई रणजीत | बालाणी भगतराम रावलमल | चौधरी महेश रतन |
| पाटील प्रतिभा सुधीर | अत्तरदे रजनी प्रकाश | जैन भागचंद मोतीलाल |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | काळे रेश्मा कुंदन | |

सदर सभेस मा.आयुक्त, चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

नगरसचिव :- आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य, **चौधरी मनोज सुरेश, पाटील चंद्रशेखर शिवाजी, कापसे प्रतिभा चंद्रकांत, कोल्हे सिंधु विजय व बेंडाळे उज्वला मोहन** यांचे रजेचे अर्ज आलेले असून ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७६ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर | १)काश्मिरमध्ये भारताचे सि.आर.पी.एफ.चे विरजवानांवर झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात ४५ जवान शहीद झालेले असुन या राष्ट्रीय दु:खात आपण सर्वच सहभागी आहेत. २)जळगांव शहरातील विजय कॉलनी परिसरातील श्री.सुनिल काकडे यांच्या मातोश्री स्व.शांताबाई गोविंदराव काकडे (कोष्टी) यांचे नुकतेच दुखद निधन ३)जळगांव शहरातील श्री.जमुनालाल व्यास यांच्या पत्नी स्व.शोभाबाई जमुनालाल व्यास यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २ | डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे उपमहापौर | म.न.पा. कर्मचारी श्री.योगेश अशोक भावसार यांच्या मातोश्री स्व.छायाबाई अशोक भावसार व श्री.समाधान देविदास नन्नवरे यांचे सासरे स्व.नगीनदास लोटन शिरसाठ यांचे नुकतेच वृध्दपकाळाने निधन झाल्याने श्रध्दांजली देण्यात येत आहे. |
| ३ | डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे उपमहापौर | काश्मिरमध्ये भारताचे सि.आर.पी.एफ.चे विरजवानांवर झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात ४५ जवान शहीद झालेले असुन या राष्ट्रीय |

| | | |
|---|---|---|
| | श्री. बागवान रियाज अहेमद<br>श्री.मनोज नारायणदास आहुजा<br>श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे<br>सौ.सरीता अनंत नेरकर<br>सौ.शुचिता अतुलसिंह हाडा | दु:खात आपण सर्वच सहभागी आहोत. |
| ४ | सौ.मिनाक्षी गोकुळ पाटील | काश्मिरमध्ये भारताचे सि.आर.पी.एफ.चे विरजवानांवर झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात ४५ जवान शहीद झालेले असुन या राष्ट्रीय दु:खात आपण सर्वच सहभागी आहेत तसेच पाणीपुरवठा इंजिनियर भांडारकर यांच्या आजी स्व.सावित्रीबाई काशिनाथ खैरनार व म.रा.वि.म.रिटायर अभियंता का.सो.बिचवे यांचे निधन झाल्याने श्रध्दांजली देण्यात येत आहे. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७७ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | सौ.सिमा सुरेश भोळे,<br>महापौर | २६ व्या राष्ट्रीय मास्अर्स टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरी प्रकारात सुवर्ण पदक तसेच संघिक स्पर्धेत ५० वर्षावरील गटाच्या रौप्यपदक प्राप्त करुन जळगांव शहराचे नावलौकित केलेबद्दल अभिनंदन |
| २ | सौ.शुचिता अतुलसिंह हाडा<br>श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे | शिवाजी नगर उड्डान पुलाचे प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्याबद्दल मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील, मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, मा.आ.श्री.राजुमामा भोळे व रेल्वे प्रशासनाचे अभिनंदन. |
| ३ | | |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मान्यवरांची झालेली निवड, त्यांनी विविध सामाजिक कार्य, क्रिडा क्षेत्रात मिळविलेले पुरस्कार, सुयश व अभिष्टचिंतनाबद्दल हे सभागृह उपरोक्त सर्वाचे अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

श्री.कैलास सोनवणे :- पुलवामा येथे शहिद झालेल्या सैनिकांचे समर्थनार्थ उद्या दि.२२/०२/२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजता चौबे शाळेपासुन रैलीचे आयोजन करण्यात आलेले असल्याने सर्वांनी त्यामध्ये सहभाग घ्यावा अशी सुचना केली.

सौ.शुचिता हाडा :- मागील महासभेत श्री.कैलास सोनवणे यांनी भुसंपादनाचा विषय मांडला होता. त्याबाबत समिती गठीत केली. म.न.पा. मार्फत सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केल्याबाबत आम्ही समिती सदस्य असुन निकाल काय झाला ? याची माहिती मिळाली नाही. समिती सदस्यांना बोलवुन त्यांचे मत घेतले गेले नाही. तसेच सन्मा.सदस्य श्री.कैलास सोनवणे यांनी सर्व तपशिलवार माहिती सभागृहास दिली. तसेच याबाबत लोकप्रतिनिधींना माहिती देणे आवश्यक वाटले नाही का ? लोकप्रतिनिधींचे मत किंवा विचार घेणे योग्य नव्हते का ? समिती सदस्यांना वतृमानपत्रामधुन याबाबत सुचना मिळाली.

मा.आयुक्त :- भुसंपादनाबाबत तारीख होती. माहे नोव्हेंबर मध्ये ठराव झाला होता. नोव्हेंबर मध्ये रिट पिटीशन दाखल झाले होते. सन्मा.सदस्यांना माहिती नाही असा नाही. ३० जानेवारीला मनपा कर्मचारी या कामी दिल्लीला गेले होते तसेच मा.आमदार व श्री.विशाल त्रिपाठी यांचेशी भुसंपादनाच्या विषयाबाबत चर्चा केली.सदरचे प्रकरण मे.सुप्रीम कोर्टात पाठविले आहे. त्यावेळेस पिटीशन दाखल करे पर्यंत कालावधी अत्यंत कमी होता. तेवढा वेळ नव्हता. या विषयाबाबत सन्मा.लोकप्रतिनिधींनी गैरसमज करु नये.

श्री.विशाल त्रिपाठी :- मा.आयुक्त सो, यांनी माझे नावाचा उल्लेख केला. त्यांनी जे सांगितले ते थोडे बरोबर आहे. मा.आयुक्त सो., यांचेकडेस हुडको व जे.डी.सी.सी. बाबतीत मा.आ.श्री.सुरेश भोळे यांचे सोबत मा.आयुक्त यांचे ऑफिस मध्ये चर्चा करायला गेलो तेव्हा ते ऑफिसमध्ये मोबाईलवर दिल्लीच्या वकीलांसोबत हुडकोबाबत चर्चा करत होते. तसेच या विषयाबाबत मा.आमदार साहेब मा.मुख्यमंत्री यांना भेटुन आलेले होते. सदर विषया करीता दिल्लीला जाणे कामी श्री.धामणे व श्री. भोळे साहेब यांचे तिकीट काढणेबाबत तसेच श्री.अनिल शाह यांचे देखील टिकीट काढणेबाबत विषय होता. त्यानंतर भुसंपादनाच्या विषयाबाबत काय झाले ते मला माहित नाही.

सौ.शुचिता हाडा :- हा जनेतेचा पैसा आहे हा पैसा आपण देत आहोत तो महानगरपालिकेचा पैसा आहे. नुकसान भरपाई जनतेच्या खिश्यातुन जाणार आहे. तेव्हा लोकप्रतिनिधी यांना इन्व्हॉल्व (Involve) करणे आवश्यक होते. या विषयाचे मे.कोर्टात सब्मीशन केले. तसेच वकीलांशी सुनावणीच्या काळात या विषयावर लोकप्रतिनिधींशी चर्चा केली असती तर काही प्रमाणात उपयोग करता आला असता प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचे एकमेकात सामंजस्य असले पाहिजे. समिती सदस्य म्हणुन आम्हाला माहिती असणे आवश्यक आहे.

श्री.अनंत जोशी :- श्री.कैलास सोनवणे यांनी कळकळीने व तळमळीने या विषयाचा बराच अभ्यास केला होता. याबाबत समिती कार्य करणार होती. परंतु आज श्री.कैलास सोनवणे म्हणतात की मी आज काहीच बोलणार नाही. सदर विषय गांर्भियाचा आहे.

श्री.नितीन लढढा :- प्रशासन व लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. सभागृहात कैलास अप्पा यांनी प्रश्न उपस्थित केला त्यावेळी आपले मत उपस्थित केले होते. त्याबाबत भुमिका मांडली होती. मा.सर्वोच्च न्यायालयात भुसंपादनाचा विषय मांडतांना ७५ सभागृह सदस्यांना सगळयांना सारखी संधी द्यावी असे मत आहे. पण ती मिळत नाही. सिनियर कॉन्सील यांची नियुक्ती झाली असती तर योग्य राहीले असते. न्यायालयात त्याचा प्रभाव पडतो. मे.कोर्टासमोर उभे राहिल्यावर त्यांची बाजु ऐकुन घेतली जाते. सिनियर कॉन्सीलला न्यायालय शांतपणे ऐकुन घेते. सर्व कागदपत्र पाहता कायद्याने एक रुपया ही त्या जमिन मालकाला देणे लागत नाही. ही तुमची खात्री पटलेली आहे. संपुर्ण सभागृहाची खात्री पटलेली आहे माझी खात्री पटलेली आहे. अशा परिस्थितीत न्यायालयाचा आदर करणे बंधनकारक आहे. खुप मोठी रक्कम आहे. छोटीमोठी रक्कम असती तर आपण समजु शकलो असतो परंतु मनपाची आर्थिक परिस्थितीचा विचार करता भुसंपादनासाठी देणे रक्कम रुपये १७ ते १८ कोटी पर्यत जाईल निश्चित जाईल याचा मला अनुभव आहे. यावर प्रॅक्टीस करणारी मंडळी आहे.साडेबारा कोटीचा आकडा समोर येतो.सदर रक्कम मोठी असुन किरकोळ स्वरुपाच्या कामासाठी भांडणे होतात. अड.श्री.शेखर नाफडे साहेबांना कोर्ट ऐकुन घेते.मे.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन सुप्रिम कोर्ट करते. योग्य सिनियर कॉन्सील लावले असते तर निश्चितपणे न्यायालयात योग्य बाजु मांडली गेली असती.

मा.आयुक्तसो :- जेव्हा Admission ची तारीख डिक्लेर झाली त्यावेळेस वकील श्री.हरिष साळवे व श्री.शेखर नाफडे यांनी स्पष्ट नकार दिला.भारत सरकार कडुन आंतरराष्ट्रीय बाजु मांडतात असे सिनियर अड.दुदैव असे होते की न्यायाधिशांना २०१७ मध्ये जस्टीस श्री.सप्रे यांनी डिसमीस केले होते.सुप्रिम कोर्टाची पध्दत असते डिले कसा झाला यावर पंधरा मिनिट डिसकस झाले सिनियर Advocate अरोरा आपल्या कडुन होत्या.सुप्रिम कोर्टात/ हायकोर्टात कोणी आला तर कसे हॅन्डल करावे हे ठरलेले असते.

आयुक्त:- तेंव्हा तारीख निश्चित झाली श्री.हरीष साळवे इतक्या छोटया मॅटरमध्ये केस घेत नाही त्यानंतर आपण श्री.वेणुगोपाल यांनाही प्रयत्न केला आपले दुर्देव असे की २०१७ मध्ये मॅटर केले ते त्यावेळेस नव्हते. पंधरा मिनिटे Discuss झाले आपली बाजू मांडली. मनपास त्यावेळेस दंड बसणार होता. आदेशाचे पालन केलेले नाही.दोन वेळेस Contempt केलेले आहे. कॉज बसतो कंन्टीन्युव केल्याने कॉज बसला नाही.त्यात नामुष्की झाली असती.कार्पोरेट सेक्टर मध्ये खुप मोठया महत्वाचे विषयाचे मॅटर असतात.

श्री.कैलास सोनवणे:- आमचे वकीला मार्फत आम्ही प्रयत्न केला असता मात्र सर्व गोष्टी संशयास्पद आहेत.चार सदस्य समितीत होते.मात्र त्यावेळेस एकही सदस्यास बोलविले नाही.वकील लावतांना श्री.साळवेंना लावायला पाहिजे होते.दि.७/१२/२१०८ चे मिटींगला या बाबत प्रश्न केला होता. याविषया बाबत कोणी अभ्यास केला आहे का. याबाबत आयुक्तांचे मत होते पैसे दिले नाहीतर अपमान होईल. पैसै देण्याची आयुक्त साहेब आपल्याला खुप घाई झाली होती. बारा कोटी ऐवजी पंचवीस कोटीचा प्रस्ताव ठेवला होता. तो नंतर बारा कोटी होऊन आला. मा.आयुक्त सो., हे आपल्याला माहित होते. त्याबाबत तुमच्या सहीने पत्र गेलेले आहे.त्यानुसार व्हॅल्युवेशन कमी करुन घेतले सदर विषय मिटींग मध्ये ठेवायचे अगोदर पाठविले होते.या सर्व गोष्टी संशयास्पद वाटतात. या विषयाबाबतीत आम्हाला लोकाकडुन विचारणा होते परंतु एव्हढया मोठया विषयाची आम्हाला माहिती नाही. या भुसंपादनाच्या प्रकरणात सर्व गोष्टी संशयस्पद वाटता. जनतेचा पैसा आहे. आपण चुकीचे केले. सर्वांना विश्वासात घ्यायला हवे होते.

मा.आयुक्त :- आम्ही व्हॅल्युवेशन कमी केले. त्यावेळेस समिती नव्हती.

श्री.कैलास सोनवणे:- त्यानंतरच २४ कोटी झाले. हे सर्व चुकीचे आहे. वकीलांनी काय म्हणणे मांडले ते आम्हा सर्वांना काहीच माहिती नाही.Proper इथल्या नगरसेवकांना माहिती पाहिजे. आमच्याशी चर्चा करावी असे आपल्याला वाटले नाही. ते भेटले नाही हा तुमचा जो समज आहे तो चुकीचा आहे. सर्व गोष्टी संशयास्पद आहे.

श्री.अमर जैन :- इथल्या नगरसेवकांना विषय माहिती पाहीजे मा.आमदारांचा विषय येत नाही. आमदारांना माहिती देऊन काय उपयोग.

श्री.नितीन लढढा :- अप्पा साहेब हा तर समजा इतिहास झाला. निर्णय आपल्या विरोधात लागले. प्रशासनाने आपआपल्या परीने प्रयत्न केले. पैसा आपण अजुन दिलेला नाही. मनपाचा पैसा वाचविण्याच्या दृष्टीने सभागृहाने प्रयत्न केले या विषयाला कोठेतरी थांबवावे या बाबत सर्व लोकप्रतिनिधींशी चर्चा करावी. याबाबत मा.नामदार श्री.गिरीष भाउ महाजन यांचेशी चर्चा करावी तसेच महाराष्ट्राचे Soliciter श्री. कुंभकोळी साहेब यांचे मत घ्यावे. तसेच आपण आज ठराव पारीत करुन जे कोणी महाराष्ट्र शासनाचे सुप्रिम कोर्टाचे काम पहातील त्यांचे माध्यमातुन राज्य शासनाला विनंती करुन प्रयत्न करावे. मेरीट वरती न्यायालयात आपले मॅटर चाललेच नाही सर. सुप्रिम कोर्टात आपले वकील समाधान करु शकले नाही. याबाबत योग्यरित्या समाधान झालेले नाही जमिन मालकाची मागणी तीच आहे तो तसाच मिळण्या बाबत अटी शर्ती नाही भविष्यात भुसंपादनाची रक्कम दयावी असे काही अटी नाही.पिंप्राळा येथिल शेतकऱ्यांच्या १०० एकर जमिनी टप्याने ७/८ वर्षात खरेदी खत करुन घेतले पेमेंट देणे संदर्भात १९९५ ते २००६ या कालावधीत घरकुले वाटप झाली.परंतु २००६ पर्यंत जमिन मालकाने खरेदी करुन घ्यावयाचे होते. तरी ही परिस्थिती निर्माण झाली नसती. परंतु तब्बल १९९५ ते २००६ पर्यंत जमीन मालकाचे डोळयादेखत घरकुलची योजना सुरु झालेली होती. त्यानंतर भुसंपादनाचे पैसे त्यांना न-मिळाल्याने उच्च न्यायालयात stand घेतला त्यामुळे जमीनीचे भुसंपादन झालेले नाही. त्या अनुषंगाने या बाबत पत्र देखिल दिलेले नाही. कारण याबाबत कायदेशिरपणे पुर्तता केलेली होती. सातबाराचे उताऱ्यावर तत्कालीन नपाचे नाव लागले खरेदी खत नसल्याने सर्टीफाय करता आले नाही. खरेदीखत करुन घेणे आवश्यक होते जमिन मालकाने तत्कालीन नपास सुचित केले असते त्या जमिनीवर कब्जा करुन गृहनिर्माण कसे

केले परंतु कायदयाच्या पळवाटा शोधुन त्याप्रमाणे हा एक धंदाच आहे. रुटीन प्रॅक्टीस मध्ये चेनलाईज असते. परंतु कुठेही ABCD माहित नसतांना वकिल मंडळींना तयार करुन मे.उच्च न्यायालयात दावा दाखल करणेबाबत अभ्यास केला परंतु याबाबत स्थानिक स्वंराज्य संस्था यांचेवर भार पडता कामा नये. त्याबाबतचा निकाल आपल्या विरोधात आहे. ही बाब नामदार श्री.गिरीष महाजन व महाराष्ट्राचे Soliciter मा.श्री.कुंभकोळी सो., राज्यशासनास मदत म्हणुन न्याय मिळुन दयावा हे यांच्या निदर्शनास आणुन द्यावी. प्रशासनाने मुदत मागुन न्याय मिळवुन मार्ग काढुन द्यावा. याबाबतीत एक प्रयत्न करुन पाहवा असे वाटते.

मा.आयुक्त :- कंटेम्पटबाबत बाऊ केला जातो. महासभेने ठराव करुन द्यावा. आपण तसे अफेडेविट करुन घ्यावे. एकत्रीत अफेडेविट करुन द्यावे. मी पण अफेडेविट देतो.

श्री.नितीन लढ्ढा :- ज्या वेळेस कंटेम्पटची भिती आहे. परंतु दोन वर्ष झाले तरी गाळयांच्या बाबतीत काय ? आपण नोटीसची वाट का पाहत आहे का? परंतु Duty म्हणुन आपण का नाही.

श्री.कैलास सोनवणे :- आपण कर्तव्यात कसुर करता आहे. शिस्त ही इच्छीक नाही सक्तीची आहे. महासभेला असे उत्तर अपेक्षित नाही.

श्री.नितीन लढ्ढा :- गाळयांचा विषय कंटेम्पटच्या अनुषंगाने आहे. सहानभुती आम्हाला सुध्दा आहे. म.न.पा.चा निष्कारण जाणारा पैसा वाचवणे हा आमचा उद्देश आहे. पुर्वी मी महापौर असतांना परस्पर Grants ट्रेझरीत जमा केल्या गेल्या. १० मार्चला पदभार संभाळल्या नंतर ग्रँटस संदर्भात मा.मुख्यमंत्री व इतर लोकांना भेटलो. एकदा ट्रेझरीत जमा झालेली Grants परत देता येत नाही. विकास कामांच्या Grants ह्या परस्पर वर्ग करु नये. असा नियम आहे. या बाबतीत तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल यांनी Grants परत देण्याचे नाकारले. नविन मा.मुख्यमंत्री यांना Grants बाबत भेटलो. ४ ते ५ वेळेस मुंबईला जाऊन १० कोटी ग्रँटसची रक्कम मिळवली. महासभेने ठराव करावा. मा.आयुक्त यांनी कंटेम्पट फाईल करावे. म.न.पा.चे खजीन्यात १० ते १२ कोटी रुपये आहे. कंटेम्पटबाबत मुंबई येथे मा.अशुतोष कुंभ कोळी सरांशी चर्चा करुन मार्ग काढावा.

मा.आयुक्त :- महासभेने ठराव करावा. Affidavite करावे.

श्री.नितीन लढ्ढा :- ठरावच करावयाचा असेल तर महासभा घेऊन उपयोग काय ? व्हिडिओ शुटींग सुरु आहे.

म.आयुक्त :- ठराव करायला काय हरकत आहे.

श्री.प्रशांत नाईक :- त्याबाबत आपली काय इच्छा आहे. तसे करावे लोकप्रतिनिधी म्हणुन श्री.कैलास अप्पा सोनवणे यांनी ब-याच वेळा पाठपुरावा केला आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- कंटेम्पट विषयी सभागृहात चर्चा झालेली आहे. प्रस्ताव आहे. सुचना आलेल्या आहेत. या विषयी गांभिर्य आहे. ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांना विंनती करुन त्यांचे मार्गदर्शन व मदत घेऊन सुप्रिम कोर्टात जाणेबाबत शासनाकडुन म.न.पा.हिताचे दृष्टीने प्रयत्न करावे.

नगरसचिव विषय क्र.१) दि.०७/१२/२०१८ व रोजी संपन्न झालेल्या तहकूब सर्वसाधारण महासभेचे तसेच दि.०७/१२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झालेल्या विशेष महासभेचे व दि.१९/०१/२०१९ रोजी झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

श्री.भगतराम बालाणी :- दि.०७/१२/२०१८ रोजी झालेले महासभेत ठराव क्र.६९ अन्वये ओमसाई ग्रामीण प्रतिष्ठान, औरंगाबाद यांना ना नफा, ना तोटाचे अटीशर्तीवर म.न.पा.ची जागा देणेची सभागृहानी मान्यता दिली आहे. परंतु ठरावात जागेचे उल्लेख केला गेला नाही. तरी त्यात दुरुस्ती म्हणुन त्यांना नानीबाई हॉस्पीटल येथील अंदाजे ३४८६.४७ स्को.फुट ची जागा कलम ७९ ब प्रमाणे ३० वर्ष कराराने अल्प दरात देणेत यावी असा उल्लेख करुन दि.०७/१२/२०१८ व रोजी संपन्न झालेल्या तहकूब सर्वसाधारण महासभेचे तसेच दि.०७/१२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झालेल्या विशेष महासभेचे व दि.१९/०१/२०१९ रोजी झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणेत यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.०७/१२/२०१८ रोजी झालेले महासभेत ठराव क्र.६९ अन्वये ओमसाई ग्रामीण प्रतिष्ठान, औरंगाबाद यांना ना नफा, ना तोटाचे अटीशर्तीवर म.न.पा.ची जागा देणेची सभागृहानी मान्यता दिली आहे. परंतु ठरावात जागेचे उल्लेख केला गेला नाही.

तरी त्यात दुरुस्ती म्हणुन त्यांना नानीबाई हॉस्पीटल येथील अंदाजे ३४८६.४७ स्को.फुट ची जागा कलम ७९ ब प्रमाणे ३० वर्ष कराराने अल्प दरात देणेत यावी असा उल्लेख करुन दि.०७/१२/२०१८ व रोजी संपन्न झालेल्या तहकूब सर्वसाधारण महासभेचे तसेच दि.०७/१२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झालेल्या विशेष महासभेचे व दि.१९/०१/२०१९ रोजी झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- भगतराम रावलमल बालाणी**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

नगरसचिव विषय क्र.२) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.३८ टॉऊन हॉल व लायब्ररी अंतर्गत मौजे निमखेडी शिवार गट नं.११८/४/१ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनाकरीता अपेक्षित खर्च रक्कम रु.५,२९,७४,०००/- मात्र व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.भगतराम बालाणी :- विषय क्रं. २, ३, ५, ६,७ व ८ चे बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी जमिन मालक यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी मनपाची आर्थिक स्थिती पाहता टि.डि.आर. देणेत यावा.
सौ.शुचिता हाडा :- सदर सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.३८ टॉऊन हॉल व लायब्ररी अंतर्गत मौजे निमखेडी शिवार गट नं.११८/४/१ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक सौ.आशा सुनिल झंवर व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक सौ.आशा सुनिल झंवर व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते** :- ५७ **प्रतिकुल मते :- ००**
**सूचक** :- भगतराम रावलमल बालाणी
**अनुमोदक** :- **हाडा शुचिता अतुलसिंह**

नगरसचिव विषय क्र.३) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.०१ गार्डन व आरक्षण क्रमांक.२ प्राथमिक शाळा अंतर्गत मौजे जळगांव शिवार स.नं.३१२/१, ३१२/२/अ, ३१२/२/ब, ३१२/३अ, व ३१२/३ब, या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनाकरीता अपेक्षित खर्च रक्कम रु.५,४६,००,०००/- मात्र व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.०१ गार्डन व आरक्षण क्रमांक.२ प्राथमिक शाळा अंतर्गत मौजे जळगांव शिवार स.नं.३१२/१, ३१२/२/अ, ३१२/२/ब, ३१२/३अ, व ३१२/३ब, या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.वसंत लक्ष्मण खडके व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.वसंत लक्ष्मण खडके व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते** :- ५७ **प्रतिकुल मते :- ००**
**सूचक** :- **भगतराम रावलमल बालाणी**
**अनुमोदक** :- **हाडा शुचिता अतुलसिंह**

नगरसचिव विषय क्र.४) गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेकडे विहीत नमुन्याप्रमाणे प्रस्ताव सादर करणे बाबत आर्किटेक्ट यांची नियुक्ती संदर्भात व गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत प्रस्ताव नियमानुकुल करणेकरीता मुदतवाढ मिळणे संदर्भात प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
श्री.भगतराम बालाणी :- गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेकडे विहीत नमुन्याप्रमाणे प्रस्ताव सादर करणे बाबत आर्किटेक्ट यांची नियुक्ती संदर्भात व गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत प्रस्ताव नियमानुकुल करणेकरीता मुदतवाढ मिळणेचा प्रस्तावानुसार मुदतवाढ देण्यात येत आहे तसेच मनपा नोंदणीकृत आर्किटेक्ट / इंजिनिअर यांचेकडील अर्ज, प्रस्ताव दाखल करुन परवानग्या देण्यात याव्यात.
सौ.शुचिता हाडा :- सन्मा.सदस्य श्री.भगतराम बालाणी यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.
श्री.नितीन लढ्ढा :- प्रस्ताव स्थगीत ठेवणेत यावा. आरक्षणातील गुंठेवारी बाबत अभ्यास करुन निर्णय घ्यावे. मुंबई उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णया बाबत इमारती नियमानुसार बांधलेल्या नसतील त्याच नियमानुसार करता येतील. योग्य तो अभ्यास करुन निर्णय घ्यावा.
श्री.कैलास सोनवणे :- समक्ष आयुक्त सो यांना भेटून चर्चा करण्यास सांगीतले. तो विषय आपल्या महापालिकेच्या अंतर्गत विषय आहे आपण केंव्हाही भेटू शकतां.
श्री.अमर जैन :- भुसंपादनाचा विषय सुरु आहे पिंप्राळा गावठाण पासून १८ मीटर रस्ता आवश्यक आहे परंतू तो १३.५ मीटर भरतो रस्ता मोजमापाची कारवाई रेल्वेने केली असून ती बरोबर आहे कां ? कि आपण केलेली बरोबर आहे ?

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेकडे विहीत नमुन्याप्रमाणे प्रस्ताव सादर करणे बाबत आर्किटेक्ट यांची नियुक्ती संदर्भात व गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत प्रस्ताव नियमानुकुल करणेकरीता प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- भगतराम रावलमल बालाणी**
**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

नगरसचिव विषय क्र.५) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वा.ह.) मध्ये मौजे मेहरुण शिवार स.नं.४१५/१अ/३/२, ४१५/१अ/३/३, या जमिनीवरील आरक्षण क्र.१४४ खेळाचे मैदान या जमिनीचे भुसंपादनाकरीता अपेक्षित खर्च रक्कम रु.६,२०,८०,०००/- मात्र व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वा.ह.) मध्ये मौजे मेहरुण शिवार स.नं.४१५/१अ/३/२, ४१५/१अ/३/३, या जमिनीवरील आरक्षण क्र.१४४ खेळाचे मैदान या जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.ओमप्रकाश सिताराम अग्रवाल व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.ओमप्रकाश सिताराम अग्रवाल व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- भगतराम रावलमल बालाणी**
**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

नगरसचिव विषय क्र.६) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (जुनी हद्द) मध्ये आरक्षण क्र.२१९ व २२० 'प्राथमिक शाळा व बगीचा' अंतर्गत मौजे खेडी शिवार स.नं.३५ व ३६/१अ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनाकरीता अपेक्षित खर्च रक्कम रु.८,९६,७०,०००/- मात्र व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (जुनी हद्द) मध्ये आरक्षण क्र.२१९ व २२० 'प्राथमिक शाळा व बगीचा' अंतर्गत मौजे खेडी शिवार स.नं.३५ व ३६/१अ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.अतुल अशोक मुंदडा यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.अतुल अशोक मुंदडा यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- भगतराम रावलमल बालाणी**
**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

नगरसचिव विषय क्र.७) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१९ 'हायस्कुल' अंतर्गत मौजे जळगांव शिवार स.नं.४२३/७ब या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनाकरीता अपेक्षित खर्च रक्कम रु.१,१७,६०,०००/- मात्र व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१९ 'हायस्कुल' अंतर्गत मौजे जळगांव शिवार स.नं.४२३/७ब या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक सौ.शैला प्रवीण खडके व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक सौ.शैला प्रवीण खडके व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- भगतराम रावलमल बालाणी**

**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

नगरसचिव विषय क्र.८) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (जुनी हद्द) मौजे जळगांव शिवार स.नं.११५/२+३/१ (सि.स.नं.३४६५/१) या जमिनीतुन १८.०० रुंद मंजुर विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत श्री.प्रवीण वासुदेव खडके, भागीदार मे.सर्वेश्वर असोसिएट, जळगांव यांची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये प्राप्त नोटीसीबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.नितीन लढ्ढा :- जागा मालक यांनी मालकीच्या जागेच्या बदली टि.डी.आर.चे मोबदल्यात जागा देणेस तयार आहे व हे महापालिकेच्या सोईचे आहे. मनपास पैसा खर्च न करता रस्ता व विकास कामे होत असतील तर परवानगी देणेस हरकत नाही. टि.डी.आर.चे बाबतीत कागदपत्रे संमीटकरुन जास्तीत जास्त ३३३ कोटी चे प्रस्ताव भूसंपादनाचे मा.जिल्हाधिकारी सो यांचे कार्यालयाकडेस गेले आहेत. मनपास एवढा मोठा मोबदला देणे शक्य नाही. सदर जागा मालक हे नंतर मे.न्यायालयात जातात व नंतर मग आपणास काहीएक निर्णय घेता येत नाही. भुसंपादनासाठी स्वतंत्र टेबल नेमून एक अधिकारी नेमावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (जुनी हद्द) मौजे जळगांव शिवार स.नं.११५/२+३/१ (सि.स.नं.३४६५/१) या जमिनीतुन १८.०० रुंद मंजुर विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.प्रवीण वासुदेव खडके,भागीदार मे.सर्वेश्वर असोसिएट,जळगांव यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.प्रवीण वासुदेव खडके,भागीदार मे.सर्वेश्वर असोसिएट,जळगांव यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- भगतराम रावलमल बालाणी**
**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

नगरसचिव विषय क्र.९) पाणी पुरवठा विभागा अंतर्गत गिरणा पंपींग, दापोरा पंपींग, जलशुध्दीकरण केंद्र (सावखेडा शिवार) या तीन ही बंद योजनेवरील जमीन त्यावरील बांधकाम व तेथे असलेल्या मशिनरी बाबत निर्णय घेणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- गिरणा पंपींग, दापोरा पंपींग, जलशुध्दीकरण केंद्र (सावखेडा शिवार) या तीन ही बंद योजनेवरील जमीन त्यावरील बांधकाम व तेथे असलेल्या मशिनरी हे ब्रिटीश काळातील असल्याने इंजिनिअर कॉलेजच्या विदयार्थ्यांचे अभ्यासाठी त्याचठिकाणी राहू देवून सदर जागेचा पर्यटन स्थळ म्हणुन विकास करुन तेथे पिकनिक पार्क तसेच गिरणा नदीच्या काठावर वॉटर पार्क, तयार करणेस तसेच सदर ठिकाणी बंधारा बांधून पर्यटकांसाठी बोटींगची व्यवस्था करणेत यावी.

श्री.नितीन लढ्ढा :- तेथिल जमीनी खालील पाईप लाईन विकून थोडे पैसे येतील.

श्री.राजेंद्र पाटील :- पर्यटन स्थळ विकसित करणेत यावे.

सौ.उज्वला बेंडाळे :- सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र पाटील यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, गिरणा पंपींग, दापोरा पंपींग, जलशुध्दीकरण केंद्र (सावखेडा शिवार) या तीन ही बंद योजनेवरील जमीन त्यावरील बांधकाम व तेथे असलेल्या मशिनरी हे ब्रिटीश काळातील असल्याने इंजिनिअर कॉलेजच्या विदयार्थ्यांचे अभ्यासासाठी त्याचठिकाणी राहू दयावे व सदर जागेचा पर्यटन स्थळ म्हणुन विकास करुन तेथे पिकनिक पार्क तसेच गिरणा नदीच्या काठावर वॉटर पार्क, तयार करणेस तसेच सदर ठिकाणी बंधारा बांधून पर्यटकांसाठी बोटींगची व्यवस्था करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**
**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

नगरसचिव विषय क्र.१०) १४ व्या वित्तीय आयोग निधी अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मधील मुस्लीम कब्रस्थान येथे ९ मीटर उंचीचे व ६ मीटर उंचीचे पोल उभारुन लाईट व्यवस्था करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्रीमती रुकसानाबी खान :- प्रशासनाचा विषय मान्य.

श्रीमती हसीनाबी शरीफ शेख :- सन्मा.सदस्या श्रीमती रुकसानाबी खान यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, १४ व्या वित्तीय आयोग निधी अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मधील मुस्लीम कब्रस्थान येथे ९ मीटर उंचीचे व ६ मीटर उंचीचे पोल उभारुन लाईट व्यवस्था करणेचे काम प्रस्तावित आहे. या कामी सन २०१७-१८ चे

जिल्हा दर सुची नुसार रक्कम रु.६,१७,६१२/- मात्र इतका खर्च अपेक्षित असून सदरचे खर्चास म.न.पा लेखा संहिता १९७१ चे कलम १६० नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- खान रुकसानाबी गबलु**
**अनुमोदक :- शेख हसीनाबी शरीफ**

नगरसचिव विषय क्र.११) विदयुत विभाग यु.क्र.३ अंतर्गत येणाऱ्या नेहरु नगर गट नं.४१५/२ दत्त मंदिर येथे अमृत योजना हरित क्षेत्र अंतर्गत ओपन स्पेस मध्ये ६ मि. उंचीचे पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- प्रशासनाचा विषय मान्य.

सौ.ज्योती चव्हाण :- सन्मा.सदस्य श्री.जितेंद्र मराठे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, विदयुत विभाग यु.क्र.३ अंतर्गत येणाऱ्या नेहरु नगर गट नं.४१५/२ दत्त मंदिर येथे अमृत योजना हरित क्षेत्र अंतर्गत ओपन स्पेस मध्ये ६ मि. उंचीचे पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे कामी अंदाजपत्रक रक्कम रु.३,८९,०२०/- मात्र तयार करण्यात आलेले असुन त्यास शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे. प्रस्तृत काम १४ व्या वित्त आयोग अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले असून गट नं.४१५/२ या खुल्या जागेमध्ये विदयुत पोल उभारण्यास हरकत नसल्या बाबत म.सहाय्यक नगर रचना विभाग मनपा जळगांव यांनी अभिप्राय दिलेला आहे. तसेच मुख्य लेखाअधिकारी यांनी १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत निधी शिल्लक असल्या बाबत अभिप्राय दिलेला असल्याने विदयुत विभाग यु.क्र.३ अंतर्गत येणाऱ्या नेहरु नगर गट नं.४१५/२ दत्त मंदिर येथे अमृत योजना हरित क्षेत्र अंतर्गत ओपन स्पेस मध्ये ६ मि. उंचीचे पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे कामी रक्कम रु.३,८९,०२०/- मात्र चे खर्चास म.न.पा लेखा संहिता १९७१ चे कलम १६० नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- मराठे जितेंद्र भगवान**
**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

नगरसचिव विषय क्र.१२) मनपा निधी अंतर्गत युनिट क्र.११ वार्ड क्र.३५ मेहरुण शिवार सर्व्हे नं.४२/१अ/१ब मध्ये कॉक्रीट गटार बांधणे कामाची इसारा अनामत रक्कम रु.१०,२२९/- मात्र मक्तेदार डी.एस.तिवारी,जळगांव यांना परत करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- प्रशासनाचा विषय मान्य.

सौ.ज्योती चव्हाण :- सन्मा.सदस्य श्री.जितेंद्र मराठे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत युनिट क्र.११ वार्ड क्र.३५ मेहरुण शिवार सर्व्हे नं.४२/१अ/१ब मध्ये कॉक्रीट गटार बांधणे कामी मक्तेदार डी.एस.तिवारी,जळगांव यांनी पावती क्रं.२९०५७ दि.१४/०३/२०११ अन्वये रक्कम रु.१०,२२९/- मात्र इसारा अनामत मनपा अर्थ विभागात जमा आहे. सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत मक्तेदार यांनी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ७ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार डी.एस.तिवारी,जळगांव यांनी म.न.पा.कडे जमा केलेली इसारा अनामत रक्कम रु.१०,२२९/- मात्र परत करणेस मनपा लेखासंहिता १९७१ चे कलम १६९ (५) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- मराठे जितेंद्र भगवान**
**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

नगरसचिव विषय क्र.१३) मनपा निधी अंतर्गत युनिट क्र.११ वार्ड क्र.३५ मेहरुण शिवार सर्व्हे नं.४२/१अ/१ब मध्ये कॉक्रीट गटार बांधणे कामाची सुरक्षा अनामत रक्कम रु.३३,१४४/- मात्र मक्तेदार डी.एस.तिवारी,जळगांव यांना परत करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- प्रशासनाचा विषय मान्य.

सौ.ज्योती चव्हाण :- सन्मा.सदस्य श्री.जितेंद्र मराठे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत युनिट क्र.११ वार्ड क्र.३५ मेहरुण शिवार सर्व्हे नं.४२/१अ/१ब मध्ये कॉंक्रीट गटार बांधणे कामी मक्तेदार डी.एस.तिवारी,जळगांव यांनी पावती क्रं.९९१३ दि.१९/०१/२०१२ अन्वये रक्कम रु.३३,१४४/- मात्र इसारा अनामत मनपा अर्थ विभागात जमा आहे. सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत मक्तेदार यांनी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ७ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार डी.एस.तिवारी,जळगांव यांनी म.न.पा.कडे जमा केलेली इसारा अनामत रक्कम रु.३३,१४४/- मात्र परत करणेस मनपा लेखासंहिता १९७१ चे कलम १६९ (४) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- मराठे जितेंद्र भगवान**
**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

नगरसचिव विषय क्र.१४) मक्तेदार विश्वकर्मा कंन्ट्रक्शन,जळगांव यांची कालबाहय इसारा अनामत परत करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- प्रशासनाचा विषय मान्य.

सौ.ज्योती चव्हाण :- सन्मा.सदस्य श्री.जितेंद्र मराठे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा बांधकाम विभागामार्फत १) यु.क्र.१ वा.क्र.६ शिवाजी नगर मुस्लिम कब्रस्थान येथे वॉचमन क्वॉर्टर बांधणे कामी पावती क्रं.२७६७ दि.२९/०८/२०११ रक्कम रु.९३००/- व २) यु.क्र.१ वा.क्रं.६ शिवाजी नगर जोगी स्मशानभुमी येथे वॉचमन क्वॉर्टर बांधणे कामी पावती क्रं.२७६६ दि.२९/०८/२०११ रक्कम रु.९३००/- मात्र मक्तेदार विश्वकर्मा कंन्ट्रक्शन,जळगांव यांनी इसारा अनामत भरलेली होती. सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत मक्तेदार यांनी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरची इसारा अनामत तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने जनरल फंडात जमा करण्यात आलेली आहे. मक्तेदार डी.एस.तिवारी,जळगांव यांनी म.न.पा.कडे जमा केलेली इसारा अनामत रक्कम परत करणेस मनपा लेखासंहिता १९७१ चे कलम १६९ (४) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- मराठे जितेंद्र भगवान**
**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

नगरसचिव विषय क्र.१५) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१७-१८ अनुदानातुन रक्कम रु.७० लक्ष मात्र अग्निशमन सेवा बळकटीकरणाबाबत प्राप्त झालेला निधी मनपा गाळे भाडे निधीतुन खरेदी (बांधणी) करण्यात येणाऱ्या ३ नग फायर फायटर (बांधणी) खरेदी कामी वर्ग करण्याबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

नगरसचिव :- विषय क्रं.१०, ११, १२, १३,१४,१५ या विषयांना अनुमोदक कोण आहे ?

श्री.भगतराम बालाणी :- उक्त विषयांचे सूचक व अनुमोदक बाबतची आपल्या विभागास आमच्याकडून यादी देण्यात येईल.

श्री.दिलीप पोकळे :- प्रशासनाचा विषय मान्य.

सौ.उज्वला बेंडाळे :- सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेचे तीन नग फायर फायटर चेसीस वरील बांधणी कामी एकुण प्रस्तावित खर्च रुपये अंदाजे १६५ लक्ष इतका असुन त्यापैकी रक्कम रु.७० लक्ष इतका निधी जिल्हा नियोजन विभागामार्फत प्राप्त झालेला आहे. सदरचा निधी फायर फायटर चेसीस वरील बांधणी कामी खर्च करणेस व उर्वरित खर्च मनपा निधीतुन खर्च करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**
**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

नगरसचिव विषय क्र.१६) अमृत अभियानांतर्गत हरीत क्षेत्र विकास कार्यक्रमा अंतर्गत बगीचे विकसीत करणेचे कामे सुरु असून त्या जागेवर कंपाऊंड वॉल (चेनलिंक फेन्सींग), बोअरवेल करणेचे कामे १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.दिलीप पोकळे :- प्रशासनाचा विषय मान्य.

सौ.उज्वला बेंडाळे :- सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

श्री.नितीन बरडे :- उन्हाळा सुरु झालेला आहे दोनशे फुटाचे वर शासनाचे नियमानुसार बोअरवेल करु शकत नाही मोहन नगर व महाबळ परीसरात ३५० फुटापेक्षा जास्त बोअर केल्यावरच पाणी लागते. आपल्या मनपाचे शौचालयाकरिता आपण ज्या बोअरवेल केलेल्या होत्या त्या बंद पडलेल्या आहेत. झांडाना पाणी देणेकामी प्रत्येक ठिकाणी बोअरवेल ऐवजी पाण्याच्या टाक्या उंच ठिकाणी बसवुन त्यामध्ये पाणी टाकावे व ते त्या झाडांना दयावे.

श्री.नितीन लढ्ढा :- भुजल सर्वेक्षण विभागाशी संपर्क साधून याबाबत नियोजन करावे.

श्री.नवनाथ दारकुंडे :- रेल्वे लाईन लगत ओपनस्पेस असल्याने डेव्हल्प करता येणार नाही नियमानुसार नोटीस दयावी लागणार. तसेच डि.पी.रोडवर अनधिकृत बांधकाम आहे. तसेच रस्ता कंटीनिव्ह झाला तरच खर्च करावा.

म.आयुक्त :- भुसंपादनाचा प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी सो यांचेकडेस पाठवावा लागेल.

श्री.अनंत जोशी :- सागर पार्कचा विषय मंजूर आहे ठराव करुन एक वर्षाचा कालावधी झालेला आहे. त्याबाबतची फाईल पेंडीग कां आहे ? सदर जागेवर पार्कींग करावे तसेच जॉगींग ट्रॅक तयार करणे कामी ७० लक्ष मंजूर केलेले आहेत. शहरासाठी एक चांगली जागा विकसित करता येईल.

श्री.सुनिल भोळे,श.अभियंता :- त्याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार केलेला असुन शासनाकडे तो विषय प्रलंबीत आहे. मायनर चुक आहे ५ कोटी अनुदानात समावेश करावी.

श्री.अनंत जोशी :- शासनाकडून याप्रकरणी लवकर पुटअप करुन निर्णय घ्यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत अमृत अभियाना अंतर्गत सन २०१५-१६, सन २०१६-१७, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात एकूण २६ हरीत क्षेत्रांना शासनाकडून मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर मंजुर १ ते २६ कामे परिशिष्ट “अ” मध्ये नमुद करण्यात आली आहे व सदर कामांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर कामांपैकी खालील कामां ठिकाणी संरक्षण भिंत, पाण्याची व्यवस्था, विजेची व्यवस्था करण्याबाबत १४ वित्त आयोगाच्या शिल्लक निधीतून करावयाचे काम खालील प्रमाणे.

| अ.क्र. | सन | कामाचे नांव | बोअरींग | चेनलिंक फेन्सींग | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१७-२०१८ | मेहरुण स.नं.४५२ खुली जागा नुतन वर्षा कॉलनी, हनुमान कॉलनी जवळ | ९९८२१.०० | २१३१५०८.०० | २२३१३२९.०० |
| २ | २०१६-२०१७ | निमखेडी शिवार गट नं.७८ खुली जागा | ९९८२१.०० | ५४३११६.०० | ६४२९३७.०० |
| ३ | २०१७-२०१८ | मेहरुण स.नं.४५५/४ खुली जागा मोहाडी ते कोल्हे हिल्स १०० फुटी रोड लगत | ९९८२१.०० | ११०६४५३.०० | १२०६२७४.०० |
| ४ | २०१६-२०१७ | पिंप्राळा गट नं.२८ खुली जागा | ९९८२१.०० | ५४३११६.०० | ६४२९३७.०० |
| ५ | २०१७-२०१८ | मेहरुण स.नं.४१५/५ दत्त मंदिर, नेहरु नगर खुली जागा | ९९८२१.०० | १२९९११५.०० | १३९८९३६.०० |
| ६ | २०१७-२०१८ | निमखेडी गट नं.१०० | ९९८२१.०० | | ९९८२१.०० |
| | | | **एकुण रक्कम रुपये** | | **६२२२२३४.००** |

प्रशासनाने प्रस्तावीत केलेनुसार १४ व्या वित्त आयोगाच्या अंतर्गत प्रस्तावीत कामसाठी येणारा खर्च रक्कम रु. ६२२२२३४.००/- मात्रला मनपा लेखा संहिता १९७१ चे कलम १६० नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

नगरसचिव विषय क्र.१७) मा.महासभा ठराव क्र.९०३ दि.०५/०५/२०१८ व महासभा ठराव क्र.९०५ दि.०५/०५/२०१८ नुसार प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.दिलीप पोकळे :- प्रशासनाचा विषय मान्य.

सौ.उज्वला बेंडाळे :- सन्मा.सदस्य श्री.दिलीप पोकळे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- दि.५/५/२०१८ चे महासभेत भाजी मार्केट व शॉपींग कॉम्पलेक्सचा विषय मांडलेला होता सदरचे विषय स्थगीत ठेवणेत आले होते. भुसंपादना बाबतचे ६७ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे रु.३३६.५५ लक्ष चे प्रस्तावीत करुन पाठविलेले आहेत. इतका निधी महानगरपालिकेस कधीच उपलब्ध होणार नाही. भुसंपादन करणे भविष्याचे दृष्टीने आवश्यक

आहे. सदर भुसंपादनाच्या रक्कमा मनपा देऊ शकत नसल्यास मे.न्यायालयात केसेस जातात मनपाकडे पैसा नाही आर्थिक स्थिती बिकट आहे याबाबत ठराव करावा. भविष्याचे दृष्टीने मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांना विनंती करुन भुसंपादन कामी ४०० कोटी रुपये अनुदान मिळणेबाबत प्रस्ताव पाठवावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.महासभा ठराव क्र.९०३ दि.०५/०५/२०१८ व महासभा ठराव क्र.९०५ दि.०५/०५/२०१८ नुसार प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव तहकूब ठेवणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**
**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

नगरसचिव विषय क्र.१८) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत १४ व्या वित्त आयोगाच्या निधी मधून भारत अभियानासाठी राखून ठेवलेल्या ५०% निधी मधून व्हॅक्युम एम्टीयर खरेदी करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सदाशिवराव ढेकळे :- प्रशासनाचा विषय मान्य.

सौ.उज्वला बेंडाळे :- सन्मा.सदस्य श्री.सदाशिवराव ढेकळे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत जळगांव शहर हागणदारीमुक्त घोषीत करण्यात आलेले आहे. शहरांनी हागणदारी मुक्तीचा दर्जा शाश्वतरित्या टिकविण्यासाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रं.स्वमअ-२०१७/ प्र.क्र.३१/नवि-३४ दि.१७ मार्च २०१७ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार शहरामध्ये बांधण्यात आलेल्या शौचालयांच्या सेप्टीक टँक नियमीतपणे साफ करुन मैला व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.एफ.एफ.बी.२०१८/प्र.क्र.१७०/नवि-४ दि.२७ नोव्हेंबर २०१८ चे नुसार १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून स्वच्छ भारत अभियानासाठी राखून ठेवलेल्या ५०% निधीतून व्हॅक्युम एम्टीयर खरेदी करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे.

शासन निर्णयानुसार राज्यामध्ये स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी सुरु असून, या अभियानांतर्गत पहिल्या टप्यात राज्यातील नागरी भाग हागणदारी मुक्त झाला आहे. हागणदारी मुक्त झालेल्या शहरांचा दर्जा कायम टिकून राहावा म्हणून मैलास व्यवस्थापन (Faecal sludge Management FSM) करणे आवश्यक आहे. मैला व्यवस्थापनांतर्गत शहरातील वैयक्तीक व सार्वजनिक शौचालयांच्या सेप्टीक टँक नियमीत कालावधीनंतर साफ करणे (De-sludging by vacuum Emptier) आवश्यक आहे. त्या करीता नव्याने एक मोठे आत्याधुनिक पध्दतीची व्हॅक्युम एम्टीयर वाहन Gem पोर्टलवरुन खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- ढेकळे सदाशिवराव गणपत**
**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

नगरसचिव विषय क्र.१९) मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टिम लि.जळगांव यांची मनपा फंडात जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रुपये २,७९,५००/- मात्र परतावा करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सदाशिवराव ढेकळे :- प्रशासनाचा विषय मान्य.

श्री.दिलीप पोकळे :- सन्मा.सदस्य श्री.सदाशिवराव ढेकळे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टिम लि.जळगांव यांनी सन २००८-०९ मध्ये मनपा मिळकती ठिकाणी उदयाने ओपन स्पेस सार्वजनीक स्थळी या ठिकाणी १०० सौर पथदिवे पुरवून बसविण्याचे कामी पावती क्रं.९८३४ दि.३१/०३/२०१० अन्वये रक्कम रु. २,७९,५००/- मात्र सुरक्षा अनामत जमा केलेली असल्याने मक्तेदारास विदयुत विभागाकडील कार्यादेश क्रं.जशमनपा/विदयुत/कार्य/०७/२००८-०९ दि.०२/०३/२००९ अन्वये देण्यात आलेले होते. त्यानुसार मक्तेदार यांनी एम.एन.आर.ई.दिल्ली/महाऊर्जा पुणे यांचे निर्देशीत केल्यानुसार त्यांनी निश्चित केलेले स्पेसीफीकेशन नुसार शहरात निश्चित केलेल्या स्थळी मुदतीत काम पुर्ण करुन देण्यात आलेले होते. मक्तेदार यांनी सदर कामाचे केलेले करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार सौर पथदिवे बसविल्यापासुन त्या कामास ८ ते ९ वर्ष पुर्ण झालेले आहे.

मक्तेदार यांची सदरची सुरक्षा अनामत मनपा फंडात जमा असुन सदरच्या सुरक्षा अनामत रक्कमेस ८ ते ९ वर्ष पेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टिम लि.जळगांव यांची जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.२,७९,५००/- मात्र परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ढेकळे सदाशिवराव गणपत**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

नगरसचिव विषय क्र.२०) जळगांव महानगरपालिकेतील वाहन चालक या पदाची सेवा म.जिल्हाधिकारी कार्यालय,नंदुरबार येथे वाहन चालक या रिक्त पदावर बदलीने नेमणूक देणेकामी श्री.दिपक साहेबराव साठे यांना ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव महानगरपालिकेतील वाहन चालक या पदाची सेवा म.जिल्हाधिकारी कार्यालय,नंदुरबार येथे वाहन चालक या रिक्त पदावर बदलीने नेमणूक देणेकामी श्री.दिपक साहेबराव साठे यांना ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- भगतराम रावलमल बालाणी**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

नगरसचिव विषय क्र.२१) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय कार्यबल समिती करीता महानगरपालिकेतील महिला सदस्यांची शिफारस करणे बाबत सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कार्यबल समिती पंरोनिका तथा महाव्यवस्थापक जिल्हा उदयोग केंद्र जळगांव यांचेकडून आलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय कार्यबल समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये शहरी भागातील नगरपालीका/महानगरपालीका यांच्या प्रतिनिधीचा समावेश करण्यात यावा असे नमुद केले आहे.

सदर प्रतिनिधीचे नामनिर्देशन जिल्हा कार्यबल समिती चे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी करणार असल्याने महानगरपालिकेतील महिला सदस्यांची शिफारस करणे बाबत सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कार्यबल समिती पंरोनिका तथा महाव्यवस्थापक जिल्हा उदयोग केंद्र जळगांव यांनी केलेल्या विनंती नुसार सदर समितीमध्ये महानगरपालिकेतील महिला सदस्या, सौ.हाडा शुचिता अतुलसिंह यांची शिफारस करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- भगतराम रावलमल बालाणी**

**अनुमोदक :- नेरकर सरिता अनंत**

नगरसचिव विषय क्र.२२) महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमातील कलम १०७ (अ) नुसार सन २०१३-१४ या आर्थिक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवालाची माहिती घेणे.

श्री.नितीन लढ्ढा :- लेखा परिक्षण अहवाल व अनुपालन अहवाल महासभेपुढे ठेवणे आवश्यक आहे कारण काही चुकीचे अनुपालन असल्यास ते दुरुस्त करता येते.

श्री.जितेंद्र मराठे :- सदर अहवाल पूढील महासभेत ठेवणेत यावा.

श्री.सचिन पाटील :- सन्मा.सदस्य, श्री.जितेंद्र मराठे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमातील कलम १०७ (अ) नुसार सन २०१३-१४ या आर्थिक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवालाची अदयावत माहिती पूढील महासभेत ठेवावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- मराठे जितेंद्र भगवान**

**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

नगरसचिव विषय क्र.२३) महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमातील कलम १०७ (अ) नुसार सन २०१४-१५ या आर्थिक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवालाची माहिती घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- सदर अहवाल पूढील महासभेत ठेवणेत यावा.

श्री.सचिन पाटील :- सन्मा.सदस्य, श्री.जितेंद्र मराठे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमातील कलम १०७ (अ) नुसार सन २०१४-१५ या आर्थिक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवालाची अदयावत माहिती पूढील महासभेत ठेवावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- मराठे जितेंद्र भगवान**
**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

नगरसचिव विषय क्र.२४) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मनपाच्या अपुर्ण अवस्थेतील घरकुलांच्या जागेवर नविन घरकुले बांधणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.जितेंद्र मराठे :- प्रशासनाचा विषय मान्य.

श्री.लढढा :- पंतप्रधान योजना चांगली आहे.

श्री.सचिन पाटील :- सन्मा.सदस्य, श्री.जितेंद्र मराठे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ मिळणे कामी आजतागायात एकूण २०७२० अर्ज प्राप्त झालेले आहे. या मध्ये शहरातील विविध भागातील घोषीत व अघोषीत झोपडपट्टीतील रहिवाशी नागरिक तसेच शहरातील विविध भागात भाडेकरी म्हणुन रहिवास करीत असलेले नागरिकांचा समावेश आहे.

या लाभार्थीना घरकुलाचा लाभ देणे कामी जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या जमीनीवर घरकुले बांधण्याचा कामाचा प्रस्ताव तयार करणे बाबत म.आयुक्त सो यांच्या सुचने नुसार या योजने करीता नियुक्त करण्यात आलेले तांत्रिक सल्लागार श्री.मनिष भुतडा यांनी मेहरुण स.नं.५०९ तसेच पिंप्राळा गट नं.२६० (पार्ट) व २६१ या जागेवर एकुण ८१६ घरकुलांचा रक्कम रु.११७.७९ कोटी चा प्रस्ताव तयार केलेला आहे.

वर नमुद मनपा मालकीच्या मेहरुण स.नं.५०९ तसेच पिंप्राळा गट नं.२६० (पार्ट) व २६१ या जागेवर तत्कालीन नगरपालिके मार्फत घरकुलाचे बांधकाम सुरु करण्यात आलेले होते. परंतु काही कारणास्तव सदर बांधकाम अपूर्ण अवस्थेत बंद पडलेले आहे. या घरकुलांच्या बांधकामातील अनियमितते संदर्भात मे.न्यायालयात दावा न्यायप्रविष्ट असुन सदर दावा अंतीम टप्प्यात आहे. तसेच अपूर्ण बांधकामामुळे मक्तेदार व मनपा यांनी त्यांचे झालेल्या नुकसानापोटी, नुकसान भरपाई मिळणेबाबत दोघांनी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. अदयाप निर्णय प्रलंबीत आहे.

सदरच्या अपूर्ण घरकुलांपैकी मेहरुण येथील घरकुलांचा आर.सी.सी.ढाचा अस्तित्वात असुन जिर्ण व कमकुवत स्थितीत आहे. तसेच पिंप्राळा येथील अपूर्ण स्थितीतील घरकुलांचा ढाचा काही अज्ञात लोकांनी तोडफोड केल्याने जमीनदोस्त झालेला आहे.

उपरोक्त नमुद मनपा मालकीच्या जागेवर प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत तयार करण्यात आलेला ८१६ घरकुलांचा रक्कम रु.११७.७९ कोटी च्या प्रस्तावामध्ये अस्तित्वातील अपूर्ण अवस्थेतील जुने व कमकुवत झालेले बांधकाम पूर्णपणे तोडुन टाकणे साठी येणारा खर्च तसेच जमीनीची किंमत, नविन घरकुले बांधकामासाठी येणारा खर्च व या घरकुलांकरीता आवश्यक इंफ्राट्रक्चर साठी येणारा खर्च देखील समाविष्ट करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत शासनाची मान्यता प्राप्त झाल्यास पिंप्राळा गट क्रं. २६० व २६१ येथील घरकुलासाठी २.५० लक्ष अनुदान प्राप्त होणार असुन उर्वरीत खर्च हा लाभार्थ्यांकडुन वसुल करावयाचा असल्याने सदर योजनेची अंमलबजावणी मनपा मार्फत केल्यास या कामी मनपावर कोणताही आर्थीक बोजा पडणार नाही व योजनेची अंमलबजावणी होऊन लाभार्थ्यांना स्वमालकीचे घरकुल देणे शक्य होणार आहे. तसेच मेहरुण स.क्र.५०९ येथील कमी उत्पन्न गटाकरीता करावयाचे बांधकामापोटी लाभार्थी यांचे मार्फत कर्ज घेतल्यास कर्जाचे व्याजाच्या रकमेत सवलत मिळणार आहे.

करिता प्रशासनाने उपरोक्त प्रमाणे मेहरूण सर्वे नं. ५०९ व पिंप्राळा गट क्रं.२६० व २६१ येथे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल बांधकाम करणेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- मराठे जितेंद्र भगवान**
**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

नगरसचिव विषय क्र.२५) म.न.पा.सेवेतुन बडतर्फ करण्यांत आलेल्या दि.०६/११/२०१७ च्या आदेशाविरुध्द न्याय मिळणेसाठी श्री.अरविंद दिनकर भोसले (बडतर्फ सहा. अभियंता) यांचे अपिल तथा विनंती अर्जावर निर्णय घेणे.

श्री.मयुर कापसे :- प्रशासनाचा विषय मान्य

श्री.सुरेश सोनवणे :- सन्मा.सदस्य, श्री.मयुर कापसे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

श्री.लढढा :- श्री.यादव यांचाही प्रस्ताव या प्रमाणे मान्य करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आयुक्त , जळगांव शहर महानगपालिका जळगांव यांनी दिनांक 06/11/2017 रोजी श्री.अरविंद दिनकर भोसले यांना बजविलेल्या बडतर्फ आदेशा विरुध्द त्यांनी अध्यक्ष स्थायी समिती म.न.पा. जळगांव यांचे कडेस दिनांक 03/02/2018 रोजी संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी, नागरीसेवा शिस्त व अपिल तसेच महाराष्ट्र प्रादेशिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार सविस्तर मुद्देनिहाय अपिल अर्ज सादर केला होता. या अर्जावर प्रशासनाकडून मुद्देनिहाय सविस्तर अहवाल प्राप्त करुन घेवून तसेच अपिल अर्जावर सुनावणीची कोणतीही कायदेशीर रितसर प्रक्रीया पार न पाडता, अधिनियमातील तरतुदी व पुराव्यांची पडताळणी केलेली नाही. तसेच सुनावणीस

समक्ष न बोलविता त्यांचे अपिल अर्जावर अध्यक्ष यांनी कोणताही अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती समोर सादर न करता प्रशासनाच्या डॉकेट मधील अपुर्ण माहितीच्या आधारे ठराव क्रं.825 दि.19/01/2018 पारीत करुन एकतर्फी निर्णय घेवून त्यांचा अपिल अर्ज फेटाळलेला आहे. प्रशासनाने त्यांचे अपिल अर्जावर सविस्तर मुद्देनिहाय तयार केलेली टिप्पणी अध्यक्ष स्थायी समिती समोर सादर केलेली नाही. सदरची टिप्पणी माहिती अधिकारात त्यांना प्राप्त झालेली असुन सदरची कार्यालयीन टिप्पणी त्यांनी या अपिल अर्जा सोबत सादर केलेली असुन या टिप्पणी नुसार त्यांचे सर्व मुद्दे प्रशासनाने मान्य केलेले आहेत. मा.महासभा हे स्थायी समितीचे निकटतम वरीष्ठ प्राधिकरण असल्याने त्यांनी सदरचा अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

श्री.भोसले सेवेत असतांना त्यांनी आज पर्यंत संस्थेचे कोणतेही आर्थिक नुकसान केलेले नाही, त्यांचेवर देशद्रोहाचा गुन्हा नाही तसेच कोणत्याही फौजदारी स्वरुपाचा गुन्हा त्यांचेवर नसतांना बडतर्फीची गंभीर शिक्षा त्यांना नियमबाह्य रित्या देण्यांत आलेली आहे. सेवेत असतांना तत्कालीन न.पा.कालावधीत गुजरात भूकंपाच्या वेळी मुख्याधिकारी यांनी सोपविलेली जबाबदारी त्यांनी प्रामाणीकपणे पार पाडलेली होती. तसेच तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांनी उत्कृष्ठ कामा बाबत त्यांना विशेष वेतनवाढ दिलेली आहे. तसेच सर्वशिक्षा अभियान विभागात सहा.अभियंता पदी कार्यरत असतांना बांधकामाचे उत्कृष्ट नियोजन केल्या बाबत संपुर्ण महाराष्ट्रात जळगांव शहर महानगरपालिकेस प्रथम क्रमांकाचे पारितोषीक मिळालेले होते या सर्व बाबींचा त्यांचे बाबतीत कोणताही विचार झाल्याचे दिसत नाही.

सहा.संचालक नगररचना यांचे विरोधात मा.महासभेने पुर्वी ठराव पारित केला होता या ठरावावरील आयुक्तांना द्यावयाच्या निवेदनावर 6 अभियांत्यांनी स्वाक्षरी केली होती. यास्तव मा.महासभेने सर्वाच्या बडतर्फीचा ठराव केला होता. परंतु तो शासनाने दिनांक 30 डिसेंबर 2016 रोजी रितसर प्रक्रीया पार पाडून विखंडीत केलेला आहे. "सहा.संचालक नगररचना यांचे विरोधात झालेला ठरावा बाबत महानगरपालिकेतील सर्व गटनेते यांनी एकत्र येवून या बाबत फेर विचार केला व यामध्ये गैरसमजुतीमुळे घडल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेवर कारवाई करण्यांत येवू नये." असे पत्र उपमहापौर तथा पिठासन अधिकारी म.न.पा.जळगांव यांनी दिनांक 29/01/2016 रोजी मा.मुख्यमंत्री सो., मा.प्रधानसचिव सो., मा.संचालक, नगररचना, पुणे व प्रत माहितीसाठी आयुक्त, जळगांव म.न.पा.यांना दिलेली आहे.

दिनांक 13/10/2015 रोजी निलंबन आदेशानंतर सर्व 6 अभियंत्यांना दिनांक 07/05/2016 रोजी एकाच प्रकारचे ज्ञापन व दोषारोप देण्यांत आले होते त्यास अनुसरुन श्री.भोसले यांनी दिनांक 13/05/2016 रोजी लेखी खुलासा देवून निलंबन रद्द करण्यांची विनंती केली होती ती तत्कालीन आयुक्त तथा शिस्तभंग प्राधिकरण अधिकारी यांनी मान्य करुन कार्यालयीन टिप्पणीवर "सक्त ताकीद देवून कामावर घेण्यांचे आदेश निर्गमीत करावेत उपायुक्त (आस्था) यांनी Posting द्याव्यात." असे लेखी आदेश दिनांक 20/05/2016 रोजी कार्यालयीन टिपणीवर दिलेले आहेत. विभागीय चौकशीत पडताळणी करीता दिलेले साक्षीदार व सादरकर्ता अधिकारी यांनी कोणतीही साक्ष वा पुरावा एकही दोषारोप सिध्द होईल असे दिलेले नाहीत. असे असतांना चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल आयुक्त यांना सादर केल्यावर प्रशासनाने त्यांना चौकशी अहवालाची प्रत न देता तसेच त्यांचे या अहवालावर अंतीम लेखी निवेदन न घेता तसेच स्थायी समितीची पुर्व मंजुरी न घेता एकतर्फी नियमबाह्य रित्या बडतर्फीचा आदेश त्यांचेवर बजाविलेला आहे. सदरची बाब नैसर्गीक न्याय तत्वाच्या विरुध्द आहे. तत्कालीन आयुक्त तथा शिस्तभंग प्राधिकरण अधिकारी यांनी सक्त ताकीद देण्यांची शिक्षा पुर्वीच दिलेली असतांना त्याच प्रकरणात पुन्हा दुसरी शिक्षा सेवेतुन बडतर्फीची देण्यांत आलेली आहे. ती Article 20 of Constitiution of India and Doctrine of Double jeopardy March 10, 2013 No comments Article 20 या तरतुदीचा भंग करणारी आहे.

प्रशासनाने न्याय न दिल्याने त्यांनी औरंगाबाद मा.उच्च न्यायालयात रिटपिटीशन क्रं.3664/2018 दाखल केलेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त अपिल 1979 चे कलम 9 (2), 9 (4) (2) व महाराष्ट्र प्रादेशिक महानगरपालिका अधिनियम कलम 56 (1) (अ), 56 (1) (ब), 56 (3) मधील तरतुदींचा भंग करुन गंभीर स्वरुपाची व त्यांचे जीवन उध्वस्थ करणारी एकतर्फी कार्यवाहीबाबत त्यांना मा.उच्च न्यायालयात न्याय मिळणारच. परंतु विलंबाने न्याय मिळाल्यास महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार आहे. तरी मा.उच्च न्यायालयात असलेली त्यांची पुर्णपणे न्यायाची मागणी नुसार दिनांक 06/11/2017 चा सेवा समाप्ती आदेश पुर्णपणे रद्द होवून सदर तारखे पासुन सेवा पुर्वरत होवून नियमीत सेवेतील सर्व लाभ मिळणेस तसेच तत्कालीन आयुक्त यांनी दिनांक 13/05/2016 रोजीचा श्री.भोसले यांचा अर्ज मान्य केल्याने निलंबन तारखेपासुन सेवेतील सर्व लाभ देणेस व प्रशासनाने सेवेत रुजू केलेनंतर श्री.भोसले यांचे अर्जात नमूद केलेनूसार मा.उच्च न्यायालयात दाखल याचीका त्वरीत मागे घेणेत यावी. मा.महासभा हे स्थायी समितीचे निकटतम वरीष्ठ प्राधिकरण असल्याने श्री.भोसले यांचे सदरचे अपिल मान्य करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- कापसे मयुर चंद्रकांत**
**अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक**

नगरसचिव विषय क्र.२६) **म.न.पा.सेवेतुन बडतर्फ करण्यांत आलेल्या दि.०६/११/२०१७ च्या आदेशाविरुध्द न्याय मिळणेसाठी श्री.गोपाळ मुरलीधर लुले (बडतर्फ शाखा अभियंता) यांचे अपिल तथा विनंती अर्जावर निर्णय घेणे.**

श्री.मयुर कापसे :- प्रशासनाचा विषय मान्य

श्री.सुरेश सोनवणे :- सन्मा.सदस्य, श्री.मयुर कापसे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आयुक्त जळगांव शहर महानगपालिका जळगांव यांनी दिनांक 06/11/2017 रोजी श्री.गोपाळ मुरलीधर लुले यांना बजविलेल्या बडतर्फ आदेशा विरुध्द त्यांनी अध्यक्ष, स्थायी समिती म.न.पा. जळगांव यांचे कडेस दिनांक 26/02/2018 रोजी संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी, नागरीसेवा शिस्त व अपिल तसेच महाराष्ट्र प्रादेशिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार सविस्तर मुद्देनिहाय अपिल अर्ज सादर केला होता. या अर्जावर प्रशासनाकडून मुद्देनिहाय सविस्तर अहवाल प्राप्त करुन घेवून तसेच अपिल अर्जावर सुनावणीची कोणतीही कायदेशीर रितसर प्रक्रीया पार न पाडता, अधिनियमातील तरतुदी व पुराव्यांची पडताळणी केलेली नाही. तसेच सुनावणीस त्यांना समक्ष न बोलविता अपिल अर्जावर अध्यक्ष यांनी कोणताही अहवाल तयार करुन स्थायी समिती समोर सादर न करता प्रशासनाच्या डॉकेट मधील अपुर्ण माहितीच्या आधारे ठराव क्रं.860 दि.09/03/2018 पारीत करुन एकतर्फी निर्णय घेवून त्यांचा अपिल अर्ज फेटाळलेला आहे. प्रशासनाने त्यांचे अपिल अर्जावर सविस्तर मुद्देनिहाय टिपणी स्थायी समिती समोर सादर केलेली नाही. मा.महासभा हे स्थायी समितीचे निकटतम वरीष्ठ प्राधिकरण असल्याने त्यांनी सदरचा अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

सहा.संचालक नगररचना यांचे विरोधात मा.महासभेने पुर्वी ठराव पारित केला होता या ठरावावरील आयुक्तांना द्यावयाच्या निवेदनावर 6 अभियंत्यांनी स्वाक्षरी केली होती. यास्तव मा.महासभेने सर्वाच्या बडतर्फीचा ठराव केला होता. परंतु तो शासनाने दिनांक 30 डिसेंबर 2016 रोजी रितसर प्रक्रीया पार पाडून विखंडीत केलेला आहे. "सहा.संचालक नगररचना यांचे विरोधात झालेला ठरावा बाबत महानगरपालिकेतील सर्व गटनेते यांनी एकत्र येवून या बाबत फेर विचार केला व यामध्ये गैरसमजुतीमुळे घडल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेवर कारवाई करण्यांत येवू नये." असे पत्र उपमहापौर तथा पिठासन अधिकारी म.न.पा.जळगांव यांनी दिनांक 29/01/2016 रोजी मा.मुख्यमंत्री सो., मा.प्रधानसचिव सो., मा.संचालक सो. नगररचना, पुणे व प्रत माहितीसाठी मा.आयुक्त सो. जळगांव म.न.पा.यांना दिलेली आहे.

दिनांक 13/10/2015 रोजी निलंबन आदेशानंतर सर्व 6 अभियंत्यांना दिनांक 07/05/2016 रोजी एकाच प्रकारचे ज्ञापन व दोषारोप देण्यांत आले होते त्यास अनुसरुन श्री.लुले यांनी दिनांक 13/05/2016 रोजी लेखी खुलासा देवून निलंबन रद्द करण्यांची विनंती केली होती ती तत्कालीन आयुक्त तथा शिस्तभंग प्राधिकरण अधिकारी यांनी मान्य करुन कार्यालयीन टिप्पणीवर "सक्त ताकीद देवून कामावर घेण्यांचे आदेश निर्गमीत करावेत उपायुक्त (आस्था) यांनी Posting द्याव्यात." असे लेखी आदेश दिनांक 20/05/2016 रोजी कार्यालयीन टिपणीवर दिलेले आहेत. विभागीय चौकशीत पडताळणी करीता दिलेले साक्षीदार व सादरकर्ता अधिकारी यांनी कोणतीही साक्ष वा पुरावा एकही दोषारोप सिध्द होईल असे दिलेले नाहीत. असे असतांना चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल आयुक्त यांना सादर केल्यावर प्रशासनाने त्यांना चौकशी अहवालाची प्रत न देता तसेच त्यांचे या अहवालावर अंतीम लेखी निवेदन न घेता तसेच स्थायी समितीची पुर्व मंजुरी न घेता एकतर्फी नियमबाह्य रित्या बडतर्फीचा आदेश बजाविलेला आहे. सदरची बाब नैसर्गीक न्याय तत्वाच्या विरुध्द आहे. तत्कालीन आयुक्त तथा शिस्तभंग प्राधिकरण अधिकारी यांनी सक्त ताकीद देण्यांची शिक्षा पुर्वीच दिलेली असतांना त्याच प्रकरणात पुन्हा दुसरी शिक्षा सेवेतुन बडतर्फीची देण्यांत आलेली आहे. ती Article 20 of Constitiution of India and Doctrine of Double jeopardy March 10, 2013 No comments Article 20 या तरतुदीचा भंग करणारी आहे.

प्रशासनाने श्री.लुले यांना न्याय न दिल्याने त्यांनी औरंगाबाद मा.उच्च न्यायालयात रिटपिटीशन क्रं.4250/2018 दाखल केलेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त अपिल 1979 चे कलम 9 (2), 9 (4) (2) व महाराष्ट्र प्रादेशिक महानगरपालिका अधिनियम कलम 56 (1) (अ), 56 (1) (ब), 56 (3) मधील तरतुदींचा भंग करुन गंभीर स्वरुपाची व त्यांचे जीवन उध्वस्थ करणारी एकतर्फी कार्यवाही बाबत त्यांना मा.उच्च न्यायालयात न्याय मिळणारच. परंतु विलंबाने न्याय मिळाल्यास महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार आहे. तरी मा.उच्च न्यायालयात असलेली त्यांची पुर्णपणे न्यायाची मागणी नुसार दिनांक 06/11/2017 चा सेवा समाप्ती आदेश पुर्णपणे रद्द होवून सदर तारखे पासुन सेवा पुर्वरत होवून नियमीत सेवेतील सर्व लाभ मिळणेस तसेच तत्कालीन आयुक्त यांनी दिनांक 13/05/2016 रोजीचा त्यांचा अर्ज मान्य केल्याने निलंबन तारखेपासुन सेवेतील सर्व लाभ देणेस व प्रशासनाने सेवेत रुजू केलेनंतर श्री.लुले यांचे अर्जात नमूद केलेनूसार मा.उच्च न्यायालयात दाखल याचीका त्वरीत मागे घेणेत यावी. मा.महासभा हे स्थायी समितीचे निकटतम वरीष्ठ प्राधिकरण असल्याने श्री.लुले यांचा सदरचा अपिल अर्ज मान्य करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक**

नगरसचिव विषय क्र.२७) प्रभाग क्रमांक १४ मधील मेहरुण येथील अशोक किराणा चौक, पटेल हॉस्पीटल जवळील चौकाचे संत श्री गाडगे बाबा महाराज चौक असे नामकरण करण्याबाबत सन्मा.सदस्या, सौ.सुरेखा सुदाम सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

श्रीमती सुरेखा सोनवणे :- प्रशासनाचा विषय मान्य

श्रीमती रेखा पाटील :- सन्मा.सदस्य, श्रीमती सुरेखा सोनवणे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक १४ मधील मेहरुण येथील अशोक किराणा चौक, पटेल हॉस्पीटल जवळील चौकाचे संत श्री गाडगे बाबा महाराज चौक असे नामकरण करण्याबाबत सन्मा.सदस्या, सौ.सुरेखा सुदाम सोनवणे यांनी दिलेल्या पत्रानुसार सदर चौकाला संत श्री गाडगे बाबा महाराज चौक असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर चौकास यापुर्वी कोणतेही नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे सुरेखा सुदाम**

**अनुमोदक :- पाटील रेखा चुडामण**

नगरसचिव विषय क्र.२८) जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१२ गट नं.४७१/अ-१/२अ मधील खुल्या जागेत विदयार्थीनींसाठी अभ्यासिका बांधणे कामास मंजुरी देणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.उज्वला मोहन बेंडाळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

श्रीमती उज्वला बेंडाळे :- प्रशासनाचा विषय मान्य

श्रीमती गायत्री राणे :- सन्मा.सदस्य, श्रीमती उज्वला बेंडाळे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत प्रभाग क्रं२८ अंतर्गत स.न.४८५/५ब मध्ये मुक्ताई लेडीज हॉस्टेलच्या समोरील खुल्या भुखंडा मध्ये विदयार्थीनींसाठी अभ्यासीका बांधणे कामी म.जिल्हाधीकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचे कडील पत्र क्र.जिनीस/जिवायो/नाविण्य/प्रमा/२०१५-१६/संस-५/३१ दि.०४/०१/२०१६ अन्वये रक्कम रु.१४२५०००/- मात्रला प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार उक्त काम करण्याकरीता ई-निविदा मागवून कार्यादेश देण्याची कार्यवाही सुरु असतांना त्याभागातील नागरिकांनी अभ्यासीका

बांधण्यास विरोध दर्शविल्याने सदरचे काम स.न.४८३/२ मधील खुल्या जागेमध्ये बांधण्यास म.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचे कडील पत्र क्र.जिनीस/जिवायो/नाविण्य/अंदाजपत्रके/२०१६-१७/संस-५/३८७ दि.०२/०३/२०१७ नुसार परवानगी देण्यात आली आहे. उक्त कामाची नव्याने ई निविदा प्रसिध्द करुन आलेल्या दरास म.आयुक्त सो यांनी मान्यता दिल्यानुसार मक्तेदार श्री.विलास प्रभाकर पाटील,जळगांव यांना कामाचा कार्यादेश देण्यात आला. सदरच्या कामास नगर रचना विभागामार्फत परवानगी घेतलेली नसल्याने तुर्त काम स्थगित ठेवण्याबाबत आदेशीत केलेले आहे. परंतु अदयाप पावेतो सदरचे काम रद्द करण्या संदर्भात कुठलाही निर्णय झालेला नसल्याने सदरचे काम रद्द करुन नव्याने प्रभाग क्रं.१२ गट नं.४७१/अ-१/२अ मधील "ब" खुल्या जागेत विदयार्थीनींसाठी अभ्यासिका बांधणे कामास व त्यानुसार नव्याने चालु आर्थीक वर्षाकरीता प्रशासकीय मान्यतेसाठी म.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती जळगांव यांच्याकडेस प्रस्ताव पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- राणे गायत्री इंद्रजीत**

नगरसचिव विषय क्र.२९) मौजे जळगांव शहरातील शिवाजी नगर भागातील उस्मानिया पार्क भागातील सुरु असलेल्या भाजीपाला बाजारास तूर्त परवानगी मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे व इतर सन्मा.सदस्य प्रभाग क्रं.१ व २ यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.नवनाथ दारकुंडे :- प्रशासनाचा विषय मान्य

श्रीमती गायत्री शिंदे :- सन्मा.सदस्य, श्रीमती उज्वला बेंडाळे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील शिवाजी नगर भागातील उस्मानिया पार्क येथे सदर जागा मालक यांची नाहरकत प्रमाणपत्र घेऊन ते महानगरपालिकेत सादर केले वरुन दर सोमवारी भाजीपाला बाजार हा नियमानुसार सुरु केलेला आहे. सदर ठिकाणी भाजीपाला सुरु करण्याचे कारण म्हणजे मनपा मार्फत शिवाजी नगर रेल्वे पुलाचे नव्याने बांधकाम सुरु करण्यात येणार असल्याने सदर पुलाचे पुर्ण बांधकाम होणेस बराच कालावधी लागणार असल्याने व उड्डान पुलाचे बांधकामामुळे शिवाजी नगर व परिसरातील नागरीकांना भाजीपाला घेण्यासाठी गावात जाणे अशक्य होणार असल्याने त्यांची अडचण दुर करणेचे उद्देशाने उक्त ठिकाणी भाजीपाला बाजार सुरु करणेत आला असल्याचे प्रभाग क्रं.२ चे सर्व सन्मा.सदस्यांनी कळविले असून भाजीपाला बाजारास तूर्त परवानगी मिळणेबाबत विनंती केल्यानुसार शिवाजी नगर भागातील उस्मानिया पार्क भागातील सुरु असलेल्या भाजीपाला बाजारास तूर्त परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- शिंदे गायत्री उत्तम**

नगरसचिव विषय क्र.३०) जळगांव शहर महानगरपालिका शिक्षण मंडळ जळगांव आस्थापने वरील असलेली सेवा जिल्हा परिषद जळगांव यांच्याकडे एकतर्फी बदली करणेबाबत श्री.समाधान सिताराम सोनवणे,प्राथ.शिक्षक.म.न.पा.सेंट्रल स्कुल क्र.१ जळगांव यांचे आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

श्री.सदाशिवराव ढेकळे :- प्रशासनाचा विषय तहकूब ठेवण्यात यावा.

श्री.दिलीप पोकळे :- सन्मा.सदस्य, श्री.सदाशिवराव ढेकळे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका शिक्षण मंडळ जळगांव आस्थापने वरील असलेली सेवा जिल्हा परिषद जळगांव यांच्याकडे एकतर्फी बदली करणेबाबतचा विषय तहकूब ठेवणेत येत आहे .

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ढेकळे सदाशिवराव गणपत**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

नगरसचिव विषय क्र.३१) गट क्र.४११/४ मधील जागा सुखमणी फाऊंडेशन, जळगांव ह्या संस्थेस जागा मिळणेबाबत अध्यक्ष, सुखमणी फाऊंडेशन, जळगांव यांचे आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

श्री.भगतराम बालाणी :- नियमाप्रमाणे विषय मान्य.

श्री.मनोज आहुजा :- सन्मा.सदस्य, श्री.भगतराम बालाणी यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सुखमणी फाऊंडेशन, जळगांव ही नोंदणीकृत संस्था असून संस्थेस सामाजिक कार्य करण्यासाठी जागेची आवश्यकता असल्याने गट क्रं.४११/४ ची जागा मिळणेबाबत अध्यक्ष, सुखमणी फाऊंडेशन, जळगांव

यांनी केलेल्या विनंती नुसार गट क्र.४११/४ मधील जागा सुखमणी फाऊंडेशन, जळगांव ह्या संस्थेस देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापुर्वी कोणास दिली नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी व प्रकरणी शासन निर्णय/आदेशानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करावी .

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- आहुजा मनोज नारायणदास**

नगरसचिव विषय क्र.३२) डॉ.आंबेडकर उद्यानात पायवाट रुंदीकरण करणे, दिवे लावणे व स्वच्छता ठेवणे करीता श्री.अश्विन गांधी व इतर नागरीकांचे आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- विषय मान्य.

श्रीमती दिपमाला काळे :- सन्मा.सदस्य, श्री.सचिन पाटील यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयान हे विकसीत करणेकामी ज्येष्ठ नागरीक विकास मंच यांना 30 वर्षाच्या कराराने अटी शर्तीनुसार देण्यात आलेले आहे परंतू विकासक यांनी मनपाची कोणतीही पुर्व परवानगी न घेता बगीच्यात अनधिकृत बांधकाम केलेले आढळून आले ते अतिक्रमण विभागाने निष्काशीत केले आहे. तसेच दैनंदिन सुरक्षा रक्षक, साफसफाई इत्यादी व्यवस्थीत ठेवत नसल्याने त्यांनी मनपा सोबत केलेला करारनाम्यातील अट क्र.१२ नुसार मक्ता रद्द करून डॉ.आंबेडकर बगीचा मनपाने ताब्यात घेणेस तसेच सदर डॉ.आंबेडकर उद्यानात पायवाट रुंदीकरण करणे , दिवे लावणे व स्वच्छता ठेवणेची व्यवस्था करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या बाबींची तात्काळ पुर्तता करुन पुढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- काळे दिपमाला मनोज**

जादा विषय क्र.१) जेष्ठ नागरीक विकास मंच यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान विकसीत करणे करीता देण्यात आलेले होते. त्यांनी करारनाम्यातील अटीशर्तीचा भंग केलेला असल्याने सदरचे उद्यान म.न.पा.च्या ताब्यात परत घेण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- प्रशासनाचा विषय मान्य.

श्रीमती दिपमाला काळे :- सन्मा.सदस्य, श्री.सचिन पाटील यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, विकास आराखडयातील आरक्षीत उदयाने, मंजूर अभिन्यासातील खुली जागा तसेच सार्व चौक सुशोभिकरण करणेचे काम सेवाभावी संस्था, खाजगी संस्था मार्फत विकसीत करणे कामी महासभा ठराव क्र.११ दि.०८/१०/२००८ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार डॉ.बाबासो आंबेडकर उदयान विकसीत करणे करीता जेष्ठ नागरीक विकास मंच यांना महासभा ठराव क्र.४१९ दि.१६/०१/२०१० अन्वये ३० वर्षाचे कराराने अटि-शर्तीनुसार देण्यात आलेले आहे.

मात्र मध्यंतरी सदर बगीच्याची पाहणी केली असता विकासक यांनी मनपाची कोणतीही पुर्व परवानगी न घेता बगीच्यात अनधिकृत बांधकाम केलेले आढळून आले ते अतिक्रमण विभागाने निष्काशीत केले आहे. तसेच दैनंदिन सुरक्षा रक्षक, साफसफाई इत्यादी व्यवस्थीत ठेवत नसल्याने त्यांनी मनपा सोबत केलेला करारनाम्यातील अट क्र.१२ नुसार मक्ता रद्द करण्यास व डॉ.आंबेडकर बगीचा मनपाचे ताब्यात घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार सदर प्रकरणी आवश्यक त्या बाबींची तात्काळ पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- काळे दिपमाला मनोज**

नगरसचिव जादाचा विषय क्र.२) शिक्षकांच्या आंतरजिल्हा एकतर्फी बदलीस मा.महासभेच्या परवानगीने नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासन अधिकारी, म.न.पा.शिक्षण मंडळ यांचे मार्फत आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.सदाशिवराव ढेकळे :- विषय तहकूब ठेवणेत यावा.

श्री.दिलीप पोकळे :- सन्मा.सदस्य, श्री.सदाशिवराव ढेकळे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शिक्षकांच्या आंतरजिल्हा एकतर्फी बदलीस मा.महासभेच्या परवानगीने नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासन अधिकारी, म.न.पा.शिक्षण मंडळ यांचे मार्फत आलेला प्रस्ताव तहकूब ठेवणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- ढेकळे सदाशिवराव गणपत**
**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

नगरसचिव ज्यादाचा विषय क्र.३५) **महासभा ठराव क्र.४० दि.१९/१२/२०१३ नुसार हा गाळे धारकांना बाजार मुल्या प्रमाणे किंमत ठरविण्यात येऊन त्यावर ५ पट दंड आकारणी करण्याचा निर्णय झालेला आहे. सदर ठरावा मध्ये मुल्यांकन व त्यावर ८% भाडे व दंड हे अन्यायकारक व बेकायदेशीर असल्याबाबत विद्यमान गाळे धारकांचे म्हणणे आहे. नियमानुसार व वाजवी आकारणी करणेबाबत महासभा ठराव क्र.२३ दि.११/१०/२०१८ नुसार गठीत करण्यात आलेल्या समिती मार्फत आलेल्या अहवालावर निर्णय घेणे.**

सौ.भारती सोनवणे :- जळगांव शहर महानगरपालिका महासभा जादा विषय क्रं.३ जळगांव शहरातील मालकीचे गाळे या संदर्भात शासनाने दि.१० डिसेंबर २०१८ रोजी दिलेल्या पत्राचे अनुषंगाने तसेच दि.१० डिसेंबर २०१८ च्या शासन आदेशानुसार त्या त्या वर्षाचे रेडीरेकनरच्या मार्गदर्शक तत्वानूसार भाडे व त्यावर २% शास्ती लावून फेरमुल्यांकन करण्यात यावे असे कळविलेले आहे. त्यानूसार शासनाच्या नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी व मे.न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

श्री.राजेंद्र घुगे पाटील :- सन्मा.सदस्या सौ.भारती सोनवणे यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

सौ.शुचिता हाडा :- मा.महापौर साहेबा, आणि आयुक्त सो सदरचा विषय बहुचर्चित व निर्णयासाठी बहुप्रतिक्षीत असा विषय आहे. व्यापारी आणि मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत या दोघांचे दृष्टीने हा महत्वाचा विषय आहे. खरे सांगीतलेतर कोणताही व्यापार हा त्या शहराचा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ज्या शहराचा व्यापारी सुस्थित असेल त्या शहरातील अर्थ व्यवस्था सुरळीत. येथे मी आज सूचन म्हणून याठिकाणी माझे मत मांडले आहे. या विषयी जी समिती स्थापन झाली होती महासभा सभा ठराव क्र.२३ दि.१५/१०/२०१८ रोजीचे सभेत समिती स्थापन झाली होती. त्या समितीच्या सदस्य या नात्याने थोडक्यात काय ते समिती कां आली ? सत्ताधारी रिस्पॉन्स कां देतो आहे ? हे थोडक्यात सांगत आहे. या समिती समोर व्यापारी यांनी आपले म्हणणे मांडले आहे. वेळोवेळी या समितीने या प्रकरणाचा एकंदर जो अभ्यास केला त्याचा अभ्यास केल्यानंतर समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, दि.१८/१२/२०१८ ला महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे पत्र महापालिकेस प्राप्त झाले आहे त्याचा मी येथे उल्लेख करु इच्छिते, अजेंडयासोबत समितीने दिलेला सर्व अहवाल सर्व सन्मा.नगरसेवकांना अवलोकनार्थ पाठविण्यात आला होता त्यामध्ये सुध्दा ते पत्र जोडण्यात आले आहे. तरी सुध्दा थोडक्यात मी हे सर्व प्रेझेंट करित आहे. या पत्रामध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे की, महापालिकेचे गाळेधार आहेत त्या गाळेधारकांना महासभा ठराव क्रं.४० दि.१९/१२/२०१३ या ठरावाचे अनुषंगाने महानगरपालिकेने गाळेधारकांना जे बिले दिले आहेत त्या संबंधीत बिलांचे विरुध्द त्यांनी हे अपिल केलेले होते. शासन दरबारी त्याच्यामध्ये शासनाने असे निर्देश दिलेले आहेत की, जळगांव महानगरपालिका ठराव ४० दि.१९/१२/२०१३ चे अनुषंगाने महानगरपालिकेने गाळेधारकांना दिलेल्या बिलांचे संदर्भात संबंधीत गाळेधारकांनी दाखल केलेल्या अपिलांचे अनुषंगाने दि.९/१०/२०१८ रोजी मा.राज्यमंत्री, नगरविकास महोदयांकडे सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीत गाळेधारकांच्या प्रतिनिधी सोबत झालेल्या चर्चेवेळी गाळेधारकांच्या प्रतिनिधींनी निर्देशनास आणून दिलेले कागदपत्रे व दिलेली माहिती विचारात घेता असे निर्देशनास आले की, गाळेधारकांचे प्रलंबित भाडे त्या त्या वर्षाचे रेडीरेकनरनूसार आकारण्यात आलेली नसून ५ पट भाडे आकारण्यात आले आहे. वास्तविक पहाता दि.१८/१२/२०१७ च्या शासन आदेशानूसार त्या त्या वर्षाचे रेडीकनरच्या मार्गदशक तत्वानूसार भाडे व त्यावर २% शास्तीची रक्कम आकारणे अभिप्रेत आहे. अधिनियमातील सुधारणेनूसार लवकरच मार्गदर्शक सूचना निर्गमीत होतील. सदयास्थितीत वर नमूद केल्यानूसार गाळेधारकांना देयके अदा केली असल्याचे आपण खातरजमा करावी तसेच त्यानूसार होणारी रक्कम संबंधीतांकडून वसूल करावी. वरील प्रमाणे कार्यवाही करताना मा.न्यायालयाच्या आदेशांचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. आम्ही समितीने जो अहवाल तयार केला आहे हा गाळेधारकांशी आमच्या झालेल्या बैठका, चर्चा व त्यांनी आमच्या समोर सादर केलेली कागदपत्रे आणि त्या पत्राचे आधाराने आणि आपले विधी अधिकारी विधीतज्ञ श्री.केतन ढाके यांनी दिलेला अभिप्राय महापौर साहेबांना तो त्यांनी अभिप्राय दिला आहे. दि.२०/२/२०१९ अभिप्राय दिला आहे. त्यांनी सुध्दा या पत्राचाच आधार घेवुन निर्णय घ्यावा असे म्हटले आहे. मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांचे मार्गदर्शनाखाली समितीने हा संपूर्ण अहवाल तयार करुन आपल्या समोर सादर केलेला आहे. तो सर्व सन्मा.सदस्यांजवळ आता तो आहे. तर त्यानूसार येथे असा ठराव होतो आहे की, शासनाचे नगरविकास विभागाने दि.१० डिसेंबर २०१८ अन्वये जळगांव महानगरपालिकेस कळविलेनूसार मनपाचे जागेवरिल गाळयांचे थकीत भाडे त्या त्या वर्षाचे शिघ्रसिध्दगणनाचे रेडीनेकनरचे दर विचार घेवुन महानगरपालिकेने निश्चित करावे व सदर रक्कम वसूल करताना थकीत रक्कमेवर अधिनियमाचे तरतूदीनूसार २% शास्तीची रक्कम आकारण्याबाबत कळविले आहे. त्यामध्ये ५ पट दंडाची आकारणी करणेबाबत कळविलेले नाही त्यामुळे ५ पट दंडाची आकारणी रद्द करण्यात येवुन शासनाने दि.१०/१२/२०१८ चे पत्रान्वये सूचित केल्यानूसार सर्व गाळयांचे पुर्नमुल्यांकन करुन त्यावर २% शास्तीची रक्कम लावुन वसुल करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी करताना मा.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याची प्रशासनाने दक्षता घ्यावी.

श्री.नितीन लढ्ढा :- मा.महापौर महोदय, मला मुख्यत्वे त्या समितीवर आक्षेप आहे. समिती गठीत करण्यासंदर्भातला जो धोरणात्मक निर्णय मागील महासभेने घेतला होता आणि त्या अनुषंगाने समितीचे झालेले गठन करण्याबाबतचा जो ठराव पारित केला होता तो प्रशासनाने राज्यशासनाकडे विखंडनाला पाठविलेला आहे. ठराव विखंडनाला पाठविला ती थोडीशी प्रशासनाला कुठेतरी घाई झाली. आयुक्त सो. तो ठराव विखंडन होणार नाही. कारण की, महासभा ठराव क्र.४० दि.१९/१२/२०१३ अन्वये पारित ठरावाबाबत चुकीची दुरुस्ती करणे कामी समिती नेमलेबाबत महासभा ठराव क्र.२३ दि.११/१०/२०१८ ला महासभा ठराव क्र.२३ च्या अनुषंगाने गठीत केलेले आहे आणि त्या समितीने अहवाल दिलेला आहे. परंतु

समिती गठीत करण्याचा अधिकार हा महासभेला आहे. मा.आयुक्त महोदय आपण थोडस काय झालं एक पाऊल पुढे चालले गेले. समिती गठन झाली समितीने कार्य करायला पाहिजे. समितीचे कार्य जर महानगरपालिकेचे हिताचे विरुध्द असेल म्हणजे आजचा ठराव मंजुर होणार असेल तर त्याला विखंडनाला पाठविणे हे कायदेशीर रित्या संयुक्तीक आहे. पण समितीचे गठन बेकायदेशीर रित्या झालेले नाही. हे समिती गठन करण्याचा महासभेला कलम ३० व कलम ३१ अन्वये कायद्याप्रमाणे मिळालेला अधिकार आहे. परंतु त्या समितीने केलेले कार्य आणि त्या कार्यामुळे महापालिकेला आर्थिक नुकसान होत असेल तर समितीचा घेतलेला निर्णय आणि तो ज्या वेळेला समिती आज ज्याचा ठरावामध्ये रुपांतर करण्याचा खटाटोप सभागृहात सुरु आहे. हा ठराव विखंडनाला जी समितीने कारणं त्यामध्ये दिलेली आहेत. त्या अनुषंगाने पाठविला असता तर ती पध्दत कायदेशीर रित्या योग्य राहिली असती. परंतु समितीचे गठन हे बेकायदेशीर रित्या झालेल्या आहे. कारण कलम ३० आणि ३१ खाली समित्यांचे गठन होत असते. कलम ३१ अ आपण वाचन करुन घ्यावे. **"३१अ (१)** प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन समित्यांवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे- कोणत्याही समितीवर पालिका सदस्यांची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतुद करण्यात आलेली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भुत असेल तरी, महानगरपालिका व्दारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट कलम (२) च्या तरतुदीनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करुन करण्यात येईल. मग ही नियुक्ती नियमीत पदावरील असो किंवा नैमित्तिक रिक्त पदावरील असो. (अ) स्थायी समिती (ब) परिवहन समिती (क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती (ड) कलम ३१ अन्वये नियुक्ती केलेली कोणतीही तदर्थ समिती **३१अ (२)** समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशिन करील : कलम ३० मध्ये कोणतीही समिती या कलम ३० खाली सभागृहाला गठीत करण्याचा अधिकार आहे. सदर समितीमध्ये ५ सदस्यांची निवड सभागृहाने केली. सन्मा.सदस्य श्री.भगतराम बालाणी, सौ.शुचिता हाडा आणि श्री.राजेंद्र पाटील हे तीन भारतीय जनता पक्षाचे सदस्य समितीमध्ये प्रतिनिधी म्हणुन गेले. दुसरे दोन शासकीय सदस्य म्हणुन मा.आयुक्त सो., व मा.सहाय्यक संचालक, नगररचना अशी ५ सदस्यांची समिती परंतु समानशीर प्रतिनिधीत्व दिल्या शिवाय त्या समितीचे गठने कायदेशीर रित्या होऊच शकत नाही. कारण त्याच्यामध्ये शिवसेनेला कोठेही तौलनिक संख्याबळाच्या अनुषंगाने सदस्यत्व प्राप्त झालेले नाही. तसेच एमआयएम ला सुध्दा त्यांचे संख्याबळानुसार त्यांना स्थान प्राप्त झालेले नाही. म्हणुन मुळात ही समिती बेकायदेशीर रित्या गठन झालेली आहे. या कारणासाठी हा ठराव विखंडनासाठी पाठवणे कायद्याने अपेक्षित होते. परंतु तो ठराव विखंडलेला नाही. त्याची जबाबदारी मा.आयुक्त यांची आहे. एखाद्या बेकायदेशीर ठरावाच्या अनुषंगाने जर पालिका सभागृहात एखादा निर्णय होत असेल. आणि त्या अनुषंगाने त्या निर्णयाची अंमलबजावणी होत असेल तर त्या ठिकाणी कायद्यातील तरतुदींचा भंग होत आहे. किंवा घेतलेला निर्णय हा निरंतर ठरु शकतो. या विषयाबाबतीत मा.आयुक्त यांनी त्यांचे मत द्यावे.

श्री.कैलास सोनवणे :- खरोखर तर हा विषय एका मिनटात मंजुर करावयाचा होता. परंतु भाऊचं म्हणणं आहे. परंतु जेव्हा हा ठराव झाला तेव्हा ऑबजेक्शन घेतलेले नव्हते.

श्री.नितीन लढ्ढा :- समिती ज्या वेळेस स्थापन झाली. त्यादिवशी सुध्दा सभागृहात मी माझी भुमिका सांगितली होती.

श्री.कैलास सोनवणे :- ठिक आहे. त्या समितीच्या अनुषंगाने नाही. या ठिकाणी सन्मा.सदस्या सौ.भारती कैलास सोनवणे यांनी विषय मांडलेला आहे. तो मान्य करावा आणि त्याच्यावर चर्चा करण्यात येऊ नये. श्री.नितीन भाऊ यांच्या समाधानासाठी मा.आयुक्त यांनी काय उत्तर असेल ते द्यावे. परंतु हा विषय येथे संपलेला आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- म्हणजे तुम्ही याला आयत्यावेळेचा विषय म्हणुन घेता आहात काय ?

श्री.कैलास सोनवणे :- जसा असेल तसा मान्य करावा. अजेंडयावर विषय आहे. आणि तेवढे बहुमत आमच्याकडे आहे. तेवढे मतदान आहे त्यामुळे काहीही अडचण नाही.

श्री.नितीन लढ्ढा :- प्रश्न बहुमताचा नाही. निर्णय घेण्याचा अधिकार आपल्याला आहे.

श्री.कैलास सोनवणे :- भाऊ मुळातच सदर प्रकरणाला उशीर खुप झालेला आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- अप्पा जितका समजता तितका सोपा विषय नाही हा. तुम्ही अनुभवी आहात आमचेही सदस्य नवनिर्वाचीत आहेत.

श्री.कैलास सोनवणे :- अजुन पेंडीग ठेवायचा कां भाऊ हा विषय ? जाऊ दया सोडा नां आता मांडला नां विषय मंजूर झाला हा विषय.

श्री.नितीन लढ्ढा :- मा.उपमहापौर साहेब आमचे १००% गाळेधारकांची रक्कम निर्लेखित करत असाल तर त्याला आमचा आक्षेप नाही.

मा.उपमहापौर :- युती झाली नां आता.

श्री.नितीन लढ्ढा :- आपले सरकार उदार सरकार आहे उदार अंतकरणाने माझा काही आक्षेप नाही तुम्हाला जो ठराव मांडायचा आहे तो तुम्ही ठराव मांडा परंतू मा.उपमहापौर साहेब या गाळेधारकांना दिलासा दयावयाचा आहे आम्ही सुध्दा त्या भुमिकेशी सहमत आहोत की गाळेधारकांना दिलासा दयावा. परंतू दिलासा मिळतांना त्यांच्या जखमेवर फूंकर घालण्यापेक्षा उलट मिठ चोळल गेल तर अजून मनस्ताप होईल. याअनुषंगाने त्या ठरावाची निर्णयाची अंमलबजावणी झाली तरच खऱ्या अर्थाने त्या गाळेधारकांना दिलासा मिळेल यासाठी मा.आयुक्त महोदयांचे मत या सभागृहात घेणे खुप गरजेचे आहे नाहीतर

काय होईल टाळया वाजून गाळेधारक निघून जातील. ठराव राज्य शासनाकडे जाईल अंमलबजावणी सहा महिन्यांनी होईल, वर्षाने होईल. डांगे साहेब सुध्दा दुसऱ्या पोस्टींगवर निघून जातील महापौराचा कार्यकाळ संपून जाईल.

श्री.कैलास सोनवणे :- उशिर करता आहे भाऊ लवकर घ्या.

श्री.नितीन लढ्ढा :- उपमहापौर साहेब आपल्याला जो निर्णय घ्यायचा तो घ्यावा मात्र मा.आयुक्त महोदयांचे मत या सभागृहामध्ये आवश्यक आहे.

श्री.कैलास सोनवणे :- मा.उपमहापौर महोदय लवकर घ्या.

मा.उपमहापौर :- विषयास आपण अनुमोदन दयावे.

श्री.कैलास सोनवणे :- अनुमोदन दिले नां. राजेंद्र पाटील यांनी अनुमोदन दिले आहे.

श्री.विष्णू भंगाळे :- आयुक्त साहेबांनी त्यांचे मत दयावे आमचा विरोध नाही ऐकून घ्यावे.

श्री.नितीन बरडे :- कैलास आप्पा आम्हाला या विषया संदर्भात आयुक्त साहेब यांचे मत हवे आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- अश्विनभाऊ डांगे साहेबांना मत देण्याची गोची होते आहे ते मत व्यक्त करु शकत नाही. अंमलबजावणी होणार नाही. यासंदर्भात आमची भूमिका तटस्थ आहे.

श्री.विष्णू भंगाळे :- या विषयाला आमची भूमिका तटस्थ आहे.

श्री.नितीन बरडे :- आमची भूमिका तटस्थ आहे.

श्री.अमर जैन :- आमची भूमिका तटस्थ आहे.

श्री.रियाज बागवान :- या विषयाला आमची सुध्दा भूमिका तटस्थ आहे सदर विषयावर मे. न्यायालयाचा अवमान होणार नाही याची प्रशासनाने दक्षता घ्यावी.

श्री.अमित काळे :- माझी तटस्थ भुमिका आहे याबाबत मा.महापौर यांचे स्वाक्षरीचे पत्र दिलेले आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका मालकीचे व्यापारी गाळे दिर्घ मुदतीने दिलेले आहेत व त्याचे पैकी बहुतांशी गाळेधारकांची भाडेपट्टयाची मुदत संपलेली आहे. महासभा विषय क्र.०६ ठराव क्र.४० दि.१९/१२/२०१३ अन्वये मुदत संपलेल्या विद्यमान गाळेधारकांकडे रेडीरेकनरनुसार येणाऱ्या किंमतीवर भाडे व त्यासह भाडयाचे ५ पट दंड येणे प्रमाणे ठराव पारीत करण्यात येऊन अंमलबजावणी करणेत येत आहे व सन २०१२ पासुन आजपावेतो आकारणी करणेत येत आहे. सदर बाब अन्यायकारक अवास्तव व बेकायदेशीर असलेबाबत गाळेधारकांची असोसिएशनने दि.११/०९/२०१८ रोजी मा.आयुक्त यांनी पत्र दिले आहे. तसेच आमदार मा.श्री.चंदुभाई विश्रामजी पटेल व आमदार मा.श्री. सुरेश दामु भोळे यांना सुध्दा सदर बाबतीत निवेदन दिलेले आहे व महोदय आमदार व्दयांनी म.आयुक्तांना पत्र देऊन असोसिएशनच्या मागणीमध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसुन येत आहे व ह्यापुर्वी झालेली आकारणीची प्रक्रिया धक्कादायक असुन या प्रकरणी लक्ष घालुन त्यामध्ये चुक आढळुन आल्यास दुरुस्तीची कार्यवाही करणेस विनंती केली होती.

तसेच शासनाचे दिनांक १८ डिसेंबर २०१७ अन्वयेच्या पत्रानुसार अशा प्रकारच्या थकीत भाडे त्या त्या वर्षाचे रेडीरेकनर विचारात घेऊन मनपाने निश्चित करणे. सदर रक्कम वसुल करतांना अधिनियमातील तरतुदीनुसार २% व्याज आकरण्यात यावे असे कळविणेत आले आहे म्हणजेच ५ पट दंड आकारणी बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट होत असल्याने सभा क्र.३ विषय क्र.२०, महासभा ठराव क्र.२३ दि.११/१०/२०१८ रोजी ठराव क्र.४० मध्ये आवश्यक ती दुरुस्ती करणे कामी ठरावामध्ये नमुद १ ते ५ बाबीवर अभ्यास करुन सभागृहास अहवाल सादर करणे कामी (१) मा.आयुक्त सो., जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव (२) मे.सहा.संचालक, नगररचनाकार सो मनपा , जळगांव (३) श्री.भगतराम बालाणी, (४) अड.सौ.शुचिता हाडा, (५) श्री.राजेंद्र घुगे पाटील यांची समिती गठीत करण्यात आली.

सदर समितीने ठरावात नमुद १ ते ५ बाबींचे संपुर्ण विषयांची चौकशी करुन समितीने अहवाल मा.महापौर साहेबांकडे सुपूर्द केलेला आहे. तो संक्षिप्त : पुढील प्रमाणे.

१) भाडे ठरविण्यासाठी धरण्यात आलेले मुल्यांकन रेडीरेकनरचे सर्व तरतुदीनुसार गाळयांचे मुल्यांकन करण्यात आले आहे किंवा कसे ?

**:-** गाळे भाडे ठरविण्यासाठी धरण्यात आलेले मुल्यांकन रेडीरेकनरचे सर्व तरतुदीनुसार नसुन म्हणजेच गाळयांच्या घसारा, रस्ते सन्मुख व आतील बाजुस असलेले गाळयांचे मुल्यांकन, मजले निहाय, पहिला व दुसरा मजला, लोव्हर ग्राऊन्ड इत्यादी बाबींचा विचार झालेला आढळुन येत नाही. सबब सहा.दुय्यम निबंधक यांनी दिलेल्या मुल्यांकनानुसार करण्यात यावे किंवा करुन घेण्यात यावे.

२) मुल्यांकनाचे ८% प्रमाणे वार्षिक भाडे ठरविणे ही शासकीय तरतुद बरोबर आहे किंवा कसे ?

**:-** दिनांक १७/१०/२००५ रोजीच्या नगरपरिषद संचनालयाचे क्र.२४ स्थायी निर्देशामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आदेशानुसार, " भाडेपट्टयाची मुदत संपल्यानंतर लगेच भाडयाची रक्कम शेवटच्या वर्षाच्या भाडेपट्टयाच्या रकमेच्या दुप्पट होईल. तद्नंतर शिघ्र परिगणना तक्त्याच्या सहाय्याने (Ready Recknor) त्रिसदस्य समितीने निश्चित केलेल्या गाळयाच्या बाजारमुल्याच्या ८ टक्के दराने गाळयाचे वार्षिक भाडे निश्चित करण्यात येईल. तसेच गाळयाचा ताबा नगरपरिषदेस देईपर्यंत सदर भाडयात दरवर्षी १० टक्के दराने वाढ करण्यात येईल. " असे नमुद करण्यात आलेले आहे. वास्तविकता नगरपरिषद संचनालयाने स्थायी निर्देश क्र.२४ हे फक्त नगरपरिषदांचे मालकीचे भाडेपटटयाने दिलेल्या मुदत संपलेल्या गाळेधारकांचे बाबतीत अवलंबवयाचे बाबतीत असुन महानगरपालिका अधिनियमात किंवा महानगरपालिका गाळेधारकांचे बाबतीत अथवा नगरविकास मंत्रालयाचे कोणतीही तरतुद व परिपत्रक नाही.

मुल्यांकनावर ८% भाडे देणेची तरतुद फक्त भुसंपादनाचे बाबतीत जमीन मालकाकडुन जमिनीचा अगावु ताबा घेतल्यास जमीन मालकाचा मालकी हक्क संपुष्टात येत असल्याने ८% भाडे संपुर्ण मोबदला मिळेपावेतो देणेची तरतुद आहे. सदर प्रकरणी मनपाचे मालकी हक्क संपुष्टात येत नसल्याने व अबाधीत राहत असल्याने ८% आकारणी करणे योग्य नाही ही वस्तुस्थिती आहे. प्रकरणी कायद्यामध्ये कोणतीही तरतुद नसल्याने ह्याबाबतीत मनपा आपल्या स्तरावर निर्णय घेवु शकते. ह्याबाबतीत ८% पेक्षा कमी करावयाचे अथवा कायम ठेवावे. ह्याबाबत सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.

३) ठरविणेत आलेले भाडे ह्यावरील ठराव क्र.४० नुसार दंड ह्यास कायदेशीर आधार आहे किंवा कसे ?

:- दिनांक १९/१२/२०१३ रोजीच्या सभा क्र.०५, विषय क्र.०६ नुसार महासभा ठराव क्र.४० नुसार गाळेधारकांना बजावण्यात आलेल्या गाळे भाडयाचे बिलांमध्ये केलेली ५ पट दंडाची आकारणी ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ च्या कोणत्याही तरतुदीनुसार आढळुन येत नाही. तरी सदर ५ पट दंडाची रक्कम कमी करण्यात यावी.

४) शासनाचे दि.१८/१२/२०१७ चे निर्णयाप्रमाणे भाडयाचे थकीत रकमेवर अधिनियमातील तरतुदीनुसार २% व्याज आकारण्यात यावे असे नमुद आहे. हे बरोबर आहे किंवा कसे ?

:- राज्य शासनाचे दि.१८/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार भाडयाचे थकीत रकमेवर अधिनियमातील तरतुदीनुसार दरमहा २% व्याज आकारण्यात यावे असे नमुद आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या ‘ अनुसुची प्रकरण ८ मधील कलम ४१ अन्वये बिलाच्या न दिलेल्या रकमेवर शास्ती आकारणे ’ यात नमुद केल्याप्रमाणे व त्याच प्रमाणे दि.१८/१२/२०१७ च्या शासन निर्णयानुसार सदर थकीत भाडयाची बीले बजावतांना एकत्रित थकीत रकमेवर २% व्याज हे शास्ती स्वरुपात घेण्यात यावे. सबब कलम ४१ नुसार कार्यवाही करणेत यावी असे वाटते.

५) मुदत संपलेल्या गाळेधारकांनी गाळा ताब्यात ठेवल्यामुळे त्याचे मुल्यांकनानुसार भाडे ठरविणे, त्यावर व्याज ठरविणे तेच ठराव क्र.४० मध्ये नमुद ५ पट दंड कमी करणे ह्या विषयी मे. न्यायालय अथवा शासनाचे कोणत्याही आदेश अथवा तरतुदीमुळे सभागृहास निर्णय घेणेस बाधा अथवा अडचण आहे किंवा कसे ?

:- न्यायालय, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयासमोर गाळयांच्या विषयी झालेल्या कामकाजात गाळयांच्या मुदत संपलेली असल्याने कलम ८१ ची कार्यवाही व्दारे गाळे ताब्यात घेणे ह्याबाबत न्यायनिवाडे झाले आहे. त्यामध्ये मुदत संपलेल्या मात्र गाळे ताब्यात घेणे ह्यामधील कालावधी करीता किती भाडे आकारणी करावी, किती दंड आकारावा व किती व्याजाची शास्तीची आकारणी करावी ह्याबाबतीत कोणतेही भाष्य अथवा मुल्यमापन केले नाही. त्यामुळे जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांना गाळयांचे मुल्यांकनानुसार भाडे ठरवणे, त्यावर शास्तीचे स्वरुपात व्याज आकारणे व त्यामध्ये दुरुस्ती करणे यास कोणतीही बाधा येत नाही, असे अहवालात नमुद आहे.

सदर अहवालावर समिती सदस्य असलेल्या मे.आयुक्त साहेब, जशमनपा व मे.सहा.संचालक, नगररचनाकार साहेब, जशमनपा यांना समिती नेमणुकीचा महासभा ठराव क्र.२३, दि.११/१०/२०१८ रोजीचा ठराव दि.०३/१२/२०१८ रोजी शासनाकडे विखंडनास प्रशासनाकडुन पाठविणेत आल्याने अहवालावर स्वाक्षरी देण्यास नकार देण्यात आला आहे.

सदरच्या सादर केलेल्या अहवालानुसार मुदत संपलेल्यागाळयांचे गाळेधारकांना बजावण्यात आलेल्या थकीत भाडयाची बिले सुधारीत करून दुरूस्त नविन बिले बजावण्यात यावी व ती वसुल करण्यात यावी. त्यानुसार ठराव क्र.४० मध्ये अंशत:बदल करणेबाबत सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक आहे असा अहवाल समितीकडुन सादर करणेत आला आहे.

सदर अहवालावर मा.महापौर ह्यांनी प्रमुख विधी सल्लागार, मनपा जळगांव श्री.केतन ढाके यांचे कडुन त्यांचे न्यायीक मत त्यांचे दिनांक २०/०२/२०१९ चे पत्र महासभा ठराव क्र.२३ (दि.११/१०/२०१८) व त्यानंतर मा.आयुक्त सो., यांनी विखंडनासाठी पाठविलेले पत्र (दि.०३/११/२०१८) यांच्या तारखांचा विचार करता त्यानंतर मा.आयुक्त सो., यांना महाराष्ट्र शासनाकडुन क्र.जमपा-२०१८/प्र.क्र.२८५/नवि-२५ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दि.१० डिसेंबर २०१८ नुसार आदेश प्राप्त झालेला असुन तो आदेश एकंदरीत महासभा ठराव क्र.४०, दिनांक १९/१२/२०१३ व त्या ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने गाळेधारकांना दिलेल्या बिलांच्या संदर्भात संबंधित गाळेधारकांनी केलेल्या अपीलाबाबत दिलेला निर्णय पाहता त्यात नमूद केल्यानुसार शासनाच्या वतीने ही बाब स्पष्ट केलेली आहे की, त्यांचा पूर्वीचा दिनांक १८/१२/२०१७ च्या आदेशानुसार त्या त्या वर्षाचे रेडीरेकनरच्या मार्गदर्शक तत्वानुसार भाडे व त्यावर २% शास्तीची रक्कम आकारणे अभिप्रेत असल्याचे त्यांचे म्हणणे असून त्यानुसार येणारी किंवा होणारी रक्कम संबंधीतांकडून वसूल करावी असे नमूद केलेले आहे. तसेच त्या आदेशात मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही असे सुध्दा शेवटी नमुद केलेले आहे. सबब महासभा ठराव क्र.२३, दिनांक ११/१०/२०१८ व त्यानंतर प्रशासनाने तो ठराव विखंडणासाठी पाठविल्यानंतर शासनाचा दिनांक १० डिसेंबर २०१८ रोजीच्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे चर्चा करुन पुढील योगय तो निर्णय महासभेने घेणे योग्य राहील, असे अड. केतन ज. ढाके यांनी आपले मत दिले आहे.

सदरचा विषय हा जळगांवातील बहुचर्चित व निर्णयासाठी बहुप्रतिक्षीत विषय आहे. व्यापारी हित व मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत या दृष्टीने महत्वाचा आहे. व्यापार हा कोणत्याही शहराच्या अर्थव्यवस्थेचा कणा असतो. ज्या शहराचा व्यापार सुस्थितीत त्या शहराची अर्थव्यवस्था सुस्थितीत असते.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करता असा ठराव करण्यात येतो की, दि.१९/१२/२०१३ रोजी पारीत झालेल्या ठराव क्र.४० मधील पाच पट दंडाची आकारणी रद्द करणेत येत आहे व शासनाचे नगरविकास विभागाकडील दिनांक १८ डिसेंबर २०१७ व दिनांक १० डिसेंबर २०१८ अन्वये व मुख्य विधी सल्लागार यांनी सुचविल्यानुसार संबंधीत मुदत संपलेल्या गाळयांचे मुल्यांकन हे त्या त्या वर्षाचे रेडीरेकनरच्या अंमलबजावणी मार्गदर्शक तत्वानुसार पुर्नमुल्यांकन करुन येणाऱ्या गाळयांचे मुल्यांकनावर ८% प्रमाणे वार्षिक भाडे व त्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीनुसार प्रलंबीत भाडयावर २% शास्ती आकारण्यात यावी. संबंधीत गाळे धारकांना सुधारीत बिल देण्यात यावे व ते संबंधीत गाळे धारकाकडून वसुल करण्यात यावे. येणे प्रमाणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी करतांना मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याची प्रशासनाने दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४६ प्रतिकुल मते :- ०० तटस्थ :- ११**
**सूचक :- सोनवणे भारती कैलास**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

येणे प्रमाणे राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**
**(भोळे सिमा सुरेश)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**